दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२५९ शुक्रवार दि.२९ मे २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-259 Friday, Dt.29 May 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# ७ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांमागे नेमकं काय घडलं ?




मुंबई /प्रतिनिधी
राज्य मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशीच सात वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनात मोठा खांदेपालट केला आहे. वरवर पाहता या बदल्या नियमित प्रशासकीय प्रक्रियेचा भाग वाटत असल्या, तरी प्रत्यक्षात आगामी निवडणुका, नाशिक कुंभमेळा, शहरी विकास प्रकल्प, महसूल व्यवस्थापन आणि राजकीय समीकरणे लक्षात घेऊनच हा निर्णय घेतल्याची चर्चा मंत्रालयीन वर्तुळात रंगू लागली आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका, आगामी प्रशासकीय पुनर्रचना आणि विविध प्राधिकरणांमधील कामकाजावर नियंत्रण मजबूत करण्याच्या पार्श्वभूमीवर या बदल्यांकडे केवळ रूटीन ट्रान्सफर म्हणून पाहता येणार नाही, असे जाणकारांचे मत आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे नाशिक कुंभमेळ्याची जबाबदारी देण्यात आली आहे. आगामी कुंभमेळा हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून हजारो कोटींच्या विकासकामांचा आणि राजकीय प्रतिष्ठेचा विषय बनला आहे. त्यामुळे अनुभवी आणि 'विश्वासू' अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आल्याचे बोलले जात आहे.

नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात पाठवण्यात आले असून, शहर विस्तार, जमीन व्यवहार आणि विकास आराखड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असल्याने या पदाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्याकडे आता नाशिक जिल्ह्याची धुरा देण्यात आली आहे. कुंभमेळा, वाढती लोकसंख्या, कायदा-सुव्यवस्था आणि राजकीय दबाव अशा अनेक आव्हानांमध्ये त्यांची खरी परीक्षा होणार आहे.ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांची जळगाव जिल्हाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामीण प्रशासनातील अनुभवाच्या जोरावर त्यांना जिल्हा पातळीवर संधी देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

मुंबईतील शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कोलते यांची पुण्याच्या साखर आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील साखर राजकारण आणि सहकार क्षेत्रावर प्रभाव टाकणारे हे पद नेहमीच राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे राहिले आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक मनोज जिंदाल यांची रत्नागिरी जिल्हाधिकारीपदी बदली करण्यात आली आहे. कोकणातील विकास प्रकल्प, पर्यटन आणि जमीन अधिग्रहणाच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.

### जनतेचा प्रश्न मात्र कायम

दरम्यान, प्रशासनातील सततच्या बदल्यांमुळे विकासकामांचा वेग मंदावतो, निर्णय प्रक्रियेत सातत्य राहत नाही आणि सामान्य नागरिकांना नव्या अधिकाऱ्यांच्या शैलीशी पुन्हा जुळवून घ्यावे लागते, अशी नाराजीही व्यक्त होत आहे. राज्यात दुष्काळ, अवकाळी पाऊस, बेरोजगारी, पायाभूत सुविधांचे प्रश्न आणि शेतकरी संकट यांसारखे गंभीर मुद्दे प्रलंबित असताना सरकारचे प्राधान्य अधिकाऱ्यांची मांडामांड करण्यात अधिक दिसत असल्याची टीका विरोधकांकडून होत आहे.आता या बदल्या प्रशासनाला नवी गती देणार की केवळ सत्तेच्या समीकरणांना मजबूत करणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### कार्यक्षमता की राजकीय व्यवस्थापन ?

प्रशासनातील सूत्रांच्या मते, सरकार सध्या निवडणूकपूर्व प्रशासकीय मांडणी करत आहे. ज्या विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर निधी, विकासकामे किंवा जनतेशी थेट संपर्क येतो, त्या ठिकाणी विश्वासार्ह अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यावर भर दिला जात आहे.
विशेष म्हणजे, नाशिक, पुणे, मुंबई, पिंपरी-चिंचवड आणि कोकण या भागांमध्ये सध्या विकासकामे, धार्मिक आयोजन आणि राजकीय हालचाली वेगाने सुरू आहेत. त्यामुळे या बदल्या निव्वळ योगायोग नसून रणनीतिक पोस्टिंग असल्याचे बोलले जात आहे.

### बदल्यांची यादी आणि त्यामागील संकेत...

रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंद्र सिंह यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पर्यावरणीय प्रश्न, औद्योगिक प्रकल्प आणि वाढत्या प्रदूषणाच्या मुद्द्यांमुळे हे पद सध्या अत्यंत संवेदनशील मानले जात आहे.

## आगीमध्ये भावाच्या मुलांना वाचवताना होरपळलेल्या ५५ वर्षीय बहिणीचा मृत्यू:बर्दापूर

### येथे एकाच कुटुंबातील चौघे अजूनही उपचाराखाली, १५ मे रोजी घडली होती घटना



बर्दापूर /प्रतिनिधी
तालुक्यातील बर्दापूर येथे १५ मे रोजी रात्रीच्या सुमारास एका घराला लागलेल्या भीषण आगीत होरपळलेल्या ५५ वर्षीय महिलेचा अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. आपल्या भावाच्या घरातील निष्पाप लहान मुलांना आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्यापासून वाचवताना ही महिला गंभीर जखमी झाली होती. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील इतर चार जण अजूनही गंभीर भाजलेले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बर्दापूर येथील रहिवासी शेख शेरू शेख हुजूर यांच्या घराला १५ मे रोजी रात्री अचानक भीषण आग लागली. आगीच्या ज्वाळा आणि धूर निघत असल्याचे पाहून शेख शेरू यांची बहीण आणि भाचा तत्काळ भावाच्या घराकडे धावले. घरात लहान मुले अडकल्याचे समजताच, स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी घरात प्रवेश केला. त्यांनी मुलांना सुखरूप बाहेर काढले. मात्र, या प्रक्रियेत घरातील सदस्यांसह मदत करायला गेलेली बहीण आणि भाचा आगीत गंभीररीत्या होरपळले. या भीषण आगीत शेख शेरू यांच्यासह कुटुंबातील पाच ते सहा जण गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, लहान मुलांना वाचवताना ६० टक्के भाजलेल्या शेख शेरू यांच्या सख्ख्या बहीण रब्बानी शेख (५५, रा. बर्दापूर) यांची प्राणज्योत उपचारादरम्यान विझली.

यांच्यावर सध्या उपचार सुरु शेख शेरू शेख हुजूर (३०), तनवीर शेरू शेख (१७), तोफिक शेरू शेख (१४), अजीम रफिक शेख(३२) या सर्व जखमींची प्रकृती अजूनही गंभीर असून, रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर त्यांच्यावर शर्थीचे उपचार करत आहेत.

## बकरी ईदच्या कुर्बानीवरुन भाजप आक्रमक, रामदास आठवले म्हणाले

# 'संविधानाला छेद देणारं काही होऊ नये, सगळे आपलेच...'

मुस्लीम धर्मियांच्या बकरी ईदच्या सणाच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून मुंबईत राजकारण तापले आहे. यंदा भाजपकडून मुंबईत सार्वजनिक ठिकाणी बकऱ्यांची कुर्बानी देण्यास प्रचंड विरोध केला आहे. त्यामुळे मिरारोड, घाटकोपर, गोरेगाव परिसरात बकरी ईदच्या कुर्बानीसाठी आणलेले बकरे तरत्र हलवण्यात आले होते. तसेच आज बकरी ईदच्या दिवशी कायदा-सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रातील एनडीए सरकारमध्ये मंत्री असलेल्या रिपाई प्रमुख रामदास आठवले यांनी भाजपलाच घरचा आहेर दिला आहे.



भारतीय संविधानाने सगळ्या धर्मांना अधिकार दिले आहेत. त्यामुळे कोणीही धार्मिक भावना भडकवू नये, असे वक्तव्य रामदास आठवले यांनी केले. ते बुधवारी पालघर येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी रामदास आठवले यांना बकरी ईदच्या कुर्बानीवरुन सुरु असलेल्या वादाबाबत विचारणा करण्यात आली. त्यावर रामदास आठवले यांनी म्हटले की, मुघल भारतात आल्यानंतर येतील हिंदू मुस्लीम झाले. त्यामुळे मुस्लीम हे काही औरंगजेबाची अवलाद नाहीत, ते आपली अवलाद आहेत. भारतात आधी सगळे हिंदूच होते. अडीच हजार वर्षांपूर्वी भारतात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे सगळे लोक होते. त्यामुळे आता कोणीही धार्मिक भावना भडकवू नयेत. अशा पद्धतीने कोणालाही विरोध करु नये, मग ते भाजपचे लोक असू देत किंवा इतर कोणी. भारतीय संविधानाला छेद देणारं काही होऊ नये. भारतामधील संविधान सर्वांसाठी आहे. कोणाच्याही धार्मिक भावनांना ठेच पोहोचता कामा नये, याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे, असे रामदास आठवले यांनी म्हटले. रामदास आठवले यांनी हे वक्तव्य करुन बकरी ईदच्या कुर्बानीवरुन इरेला पेटलेल्या भाजपला एकप्रकारे घरचा आहेर दिला आहे. त्यामुळे यावर भाजप काही प्रतिक्रिया देणार का, हे बघावे लागेल.

मिरा रोड येथील पूनम इस्टेट क्लस्टर १ म्पलेक्समधील सोसायटीत कुर्बानीसाठी आणलेल्या बकऱ्यांवरून काही दिवसांपूर्वी वाद निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून बुधवारी पूनम इस्टेट क्लस्टर ३ परिसरातील पाच ते सात बकऱ्या पोलीसांच्या बंदोबस्तात पालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी हलवण्यात आल्या. शिमीरा पोलिसांनी सायंकाळच्या सुमारास ही कारवाई केली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच परिसरातील वातावरण शांत राहावे, यासाठी बकऱ्यांना टेम्पोमधून हलवण्यात आले. यावेळी परिसरात पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर तसेच शेजारच्या कॉम्पलेक्समध्ये यापूर्वी झालेल्या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने विशेष सतर्कता बाळगली आहे. आज बकरी ईद असल्याने संपूर्ण मिरा भाईंदर शहरात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली असून, कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी सुमारे ५२५ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाकडून नागरिकांना शांतता व सौहार्द राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### डॉलरनंतर आता चिनी 'युआन'समोर
## रुपयाची ऐतिहासिक घसरण



जागतिक बाजारातील घडामोडी आणि पश्चिम आशियातील वाढत्या तणावादरम्यान भारतीय चलन 'रुपया' केवळ अमेरिकन डॉलरच्या तुलनेतच कमकुवत होत नसून, शेजारील देश चीनचे चलन 'युआन'च्या तुलनेतही कमालीचा घसरला आहे. या घसरणीमुळे भारतासमोर एक मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

चीनमधून मोठ्या प्रमाणावर आयात होणाऱ्या कच्च्या मालाच्या आणि वस्तूंच्या किमती आता वाढणार आहेत. त्यामुळे देशात पुन्हा एकदा महागाईचा भडका उडण्याची भीती निर्माण झाली आहे. या उलट, भारतीय रुपयाच्या पडझडीचा थेट फायदा चीनच्या अर्थव्यवस्थेला मिळत आहे.

## एसटी बसची दुचाकीला जोरदार धडक; एक तरुण गंभीर जखमी



माजलगाव । प्रतिनिधी
माजलगाव शहरातील गडी रोड परिसरातील हॉटेल शिवालय समोर एसटी बसने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना आज सकाळी ९:३६ च्या सुमारास घडली.

जखमी तरुणाचे नाव अर्जुन गायकवाड (रा. वडगाव, ता. माजलगाव) असे असून, तो केसापुरी भागातील श्री समर्थ पेट्रोल पंपावर कामाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अर्जुन हा सावरगाव येथून आपल्या वडगाव या गावी परतत होता. दरम्यान, गडी रोडवरील हॉटेल शिवालय समोर आला असता, पाठीमागून भरधाव आलेल्या एसटी बसने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात अर्जुन गायकवाड गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे हलवण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेचा अधिक तपास स्थानिक पोलीस करत आहेत.

# जालना मनपात पुन्हा लाचखोरीचा भूकंप ४० हजारांच्या लाचेप्रकरणी दोन बडे अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

### टी हाऊस वर हायव्होल्टेज ड्रामा अतिक्रमण हटाव पथकाचे राठोड आणि कसबे रंगेहात गजाआड मनपा वर्तुळात प्रचंड खळबळ

जालना /प्रतिनिधी :-
जालना महानगरपालिकेत पुन्हा एकदा लाचखोरीचे गॉडफादर सक्रिय झाले असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी टाकलेल्या एका धडक धाडीमुळे भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे पुरते दणाणले आहेत. एका नागरिकाच्या हक्काच्या कामासाठी म्हणजेच अतिक्रमण हटवण्यासाठी चक्क ४० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या आणि ती स्वीकारणाऱ्या मनपाच्या दोन बड्या अधिकाऱ्यांना एसीबीने रंगेहात दबोचले. जालना मनपा स्थापन झाल्यापासूनची ही दुसरी सर्वात मोठी कारवाई असल्याने संपूर्ण प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.एसीबीच्या जाळ्यात अडकलेले पांढरपेशी लाचखोर

भाऊराव चापा राठोड वय ५७ वर्ष अधिकारी अतिक्रमण हटाव पथक मनपा जालना. श्यामसन छबुराव कसबे वय ५१ वर्ष अधिकारी अतिक्रमण हटाव पथक मनपा जालना.

शहरातील मामा चौक ते कोलू तेल घाना संघ परिसरातील अतिक्रमण हटवण्यासाठी एका




३७ वर्षीय जागरूक नागरिकाने मनपाकडे रीतसर अर्ज केला होता. या अर्जाची गांभीर्याने दखल घेत मनपा आयुक्तांनी तातडीने अतिक्रमण हटवण्याचे आदेशही दिले होते. मात्र आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत अधिकारी भाऊराव राठोड आणि श्यामसन कसबे हे दोघे कारवाई करण्यासाठी जाणूनबुजून टाळाटाळ करत होते. अखेर हक्काची कारवाई करण्यासाठी त्यांनी तक्रारदाराकडे थेट ४० हजार रुपयांची लाच मागितली

बाबा टी हाऊस'वर रंगला हायव्होल्टेज ड्रामा

तक्रारदाराची लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने त्यांनी थेट एसीबी चे दार ठोठावले. २० मार्च रोजी एसीबीने या लाचेच्या मागणीची अत्यंत गोपनीयतेने पडताळणी केली ज्यामध्ये श्यामसन कसबे याने लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर गुरुवारी दि.२८ मे २०२६ रोजी शहरातील दवा बाजार येथील प्रसिद्ध बाबा टी हाऊस येथे एसीबीचे पोलीस उपअधीक्षक आणि त्यांच्या पथकाने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे आरोपी भाऊराव राठोड हा तक्रारदाराकडून लाचेची ४० हजारांची रोकड स्वीकारत असतानाच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने वाघासारखी झडप घातली आणि त्याला रंगेहात बेड्या ठोकल्या.

महागडे मोबाईल आणि रोकड जप्त गुन्हा दाखल

एसीबीने केलेल्या या धडक कारवाईत आरोपींची अंगझडती घेण्यात आली. त्यांच्याकडून सॅमसंग आणि ओप्पो कंपनीचे महागडे मोबाईल फोन आणि लाचेची ४० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. या दोन्ही भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

मनपा भ्रष्टाचाराचा पार्ट-२ तत्कालीन आयुक्तांनंतर आता या माशांना गळ

जालना महानगरपालिकेच्या स्थापनेला काहीच काळ लोटला असताना येथील भ्रष्टाचाराची वाळवी संपूर्ण मनपा पोखरत असल्याचे या कारवाईवरून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. यापूर्वी जालन्याचे तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर यांना तब्बल १० लाख रुपयांची लाच घेताना पकडण्यात आले होते. तो महाधक्का ताजा असतानाच, आता अतिक्रमण विभागाच्या या दोन माशांना एसीबीने गळाला लावला आहे.

लाच द्याल तर थेट तुरुंगात जाल एसीबीचा कडक इशारा

एसीबीच्या या अत्यंत गोपनीय आणि धडाकेबाज कारवाईमुळे लाचखोर अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.जनतेच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्यांना सोडणार नाही असा कडक इशारा या कारवाईतून देण्यात आला आहे. दरम्यान जालना शहरातून लाचखोरांना धडा शिकवणाऱ्या एसीबीच्या या कामगिरीचे जनतेतून प्रचंड कौतुक आणि स्वागत होत आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)


संपादकीय....

# शिवसंवाद दौरा

## संवाद की शक्तीप्रदर्शनाचा राजकीय प्रयोग ?

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एक वेगळीच हालचाल सुरू आहे. सत्ता स्थिर दिसत असली तरी जमिनीवर अस्वस्थता आहे, कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम आहे आणि मतदारांच्या मनात प्रश्न आहेत. अशा वेळी राज्यभर सुरू असलेला शिवसंवाद दौरा हा केवळ संघटनात्मक कार्यक्रम नसून भविष्यातील राजकीय समीकरणांची चाचपणी असल्याचे स्पष्ट संकेत दिसू लागले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या या दौऱ्याचा बीड जिल्ह्यातील टप्पा विशेष महत्त्वाचा मानला जात आहे.

कारण बीड हा केवळ राजकीयदृष्ट्या संवेदनशील जिल्हा नाही, तर महाराष्ट्राच्या ग्रामीण जनमताची दिशा ठरवणारा जिल्हा म्हणूनही त्याची ओळख आहे. मराठवाड्यातील बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय असंतोषाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचा हा संवाद दौरा म्हणजे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि संघटनात्मक अस्तित्व यासाठीचा पाया रचण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते.

शिवसंवाद की विश्वास परत मिळवण्याची मोहीम ?

२०१९ नंतर महाराष्ट्रात जे राजकीय भूकंप झाले, त्यात सर्वात मोठा धक्का शिवसेनेच्या पारंपरिक मतदाराला बसला. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर भाजपसोबत निवडणूक लढवून नंतर महाविकास आघाडीचा प्रयोग, त्यानंतर पक्षातील फुट आणि सत्तांतर या सर्व घटनांमुळे सामान्य शिवसैनिक मानसिकदृष्ट्या गोंधळलेला आहे. आजही गावपातळीवर अनेक कार्यकर्ते खरी शिवसेना कोणाची ? या प्रश्नात अडकलेले दिसतात.

याच पार्श्वभूमीवर शिवसंवाद दौरा हा प्रत्यक्षात जनतेपेक्षा स्वतःच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न अधिक वाटतो. कारण निवडणुका केवळ सत्तेच्या समीकरणांनी जिंकल्या जात नाहीत. त्या जिंकण्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांचा विश्वास, भावनिक नाळ आणि नेतृत्वावरची निष्ठा महत्त्वाची असते. शिंदे गटाला आजही हीच वैधता सिद्ध करायची आहे.

भाजपसोबत सत्ता, पण सावलीत जाण्याची भीती..

राज्यात भाजप हा मोठा भाऊ आणि शिवसेना शिंदे गट हा सत्तेतील भागीदार अशी प्रतिमा अधिकाधिक ठळक होत चालली आहे. अनेक निर्णयांमध्ये भाजपचे वर्चस्व स्पष्ट दिसते. मुख्यमंत्रीपदाचा चेहरा बदलला असला तरी प्रशासकीय नियंत्रण, निवडणूक यंत्रणा आणि राजकीय अजेंडा मोठ्या प्रमाणात भाजपकडेच असल्याची भावना शिवसैनिकांमध्ये वाढत आहे.

यामुळेच शिवसंवाद दौरा हा केवळ जनतेशी संवाद नसून स्वतःची स्वतंत्र राजकीय ओळख टिकवण्याचा प्रयत्न आहे. आम्ही फक्त सत्तेतील सहयोगी नाही, तर स्वतंत्र जनाधार असलेली ताकद आहोत, हा संदेश या दौऱ्यातून दिला जात आहे. विशेष म्हणजे हा दौरा ग्रामीण भागात अधिक केंद्रित दिसतो. कारण शहरांमध्ये भाजप मजबूत असला तरी ग्रामीण महाराष्ट्रात अजूनही शिवसेनेचे भावनिक नेटवर्क अस्तित्वात आहे.

बीड दौऱ्याचे वेगळे राजकीय महत्त्व...

बीड जिल्हा म्हणजे केवळ राजकीय सभा घेण्याचा भाग नाही. तो संघर्ष, दुष्काळ, बेरोजगारी, स्थलांतर, ऊसतोड मजूर आणि शेतकरी असंतोषाचे वास्तव आहे. येथे जनतेच्या प्रश्नांवर थेट संवाद साधल्याशिवाय राजकीय जमीन तयार होत नाही.

शिंदे गटासाठी बीडमध्ये दौरा करणे म्हणजे मराठवाड्यातील नाराजीचा अंदाज घेणेही आहे. कारण गेल्या काही काळात शेतकरी प्रश्न, आरक्षण, बेरोजगारी, अपुरी पायाभूत सुविधा आणि स्थानिक नेतृत्वातील गटबाजी यामुळे जनतेत नाराजी आहे. ही नाराजी विरोधक भांडवल म्हणून वापरण्याच्या तयारीत आहेत.

त्यामुळेच हा दौरा म्हणजे केवळ शक्तीप्रदर्शन नसून जनमताचा थर्मामीटर तपासण्याचा प्रयत्न आहे. सभांमध्ये होणारी गर्दी आणि प्रत्यक्ष मतदानातील कल यामध्ये फरक असतो, हे महाराष्ट्राने अनेक वेळा पाहिले आहे. त्यामुळे केवळ बॅनर, पोस्टर आणि घोषणांनी वास्तव झाकले जात नाही.

शिवसैनिकांसाठीही आत्मपरीक्षणाची वेळ...

आज शिवसैनिकांसमोर सर्वात मोठा प्रश्न आहे तो विचारांचा. शिवसेना ही केवळ सत्ता मिळवण्यासाठीची यंत्रणा होती का, की एक विचार, अस्मिता आणि संघर्षाची परंपरा होती ? जर ती परंपरा जिवंत ठेवायची असेल तर कार्यकर्त्यांना फक्त सत्तेतील पदे नव्हे, तर निर्णय प्रक्रियेत मान-सन्मान आणि भूमिका मिळणे आवश्यक आहे.

अनेक ठिकाणी जुन्या शिवसैनिकांना बाजूला सारून नव्याने आलेल्या राजकीय आयात नेत्यांना महत्त्व दिले जात असल्याची भावना वाढत आहे. हेच वास्तव भविष्यात धोकादायक ठरू शकते. कारण शिवसेना ही नेहमीच कार्यकर्त्यांच्या घामावर उभी राहिली.केवळ सत्तेच्या समीकरणांवर नाही.

संवाद यशस्वी ठरायचा असेल तर

जर हा शिवसंवाद दौरा खरोखर संवादासाठी असेल, तर त्यात जनतेच्या प्रश्नांना उत्तर द्यावे लागेल. बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, वाढती महागाई, स्थानिक भ्रष्टाचार, अपूर्ण विकासकामे आणि प्रशासनातील ढिसाळपणा यावर स्पष्ट भूमिका घ्यावी लागेल. अन्यथा हा दौरा केवळ राजकीय इव्हेंट मॅनेजमेंट म्हणून ओळखला जाईल.

आज महाराष्ट्रातील मतदार पूर्वीपेक्षा अधिक जागरूक आहे. तो फक्त भावनिक भाषणांवर विश्वास ठेवत नाही. त्याला परिणाम दिसायला हवेत. त्यामुळे शिवसंवाद खऱ्या अर्थाने जनसंवाद ठरवायचा असेल तर सत्ता आणि वास्तव यामधील दरी कमी करावी लागेल.

अन्यथा, गर्दीच्या टाळ्यांमध्ये दडलेली नाराजी पुढच्या निवडणुकीत शांतपणे आपला निकाल देईल आणि तेव्हा कोणताही दौरा परिस्थिती बदलू शकणार नाही.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/३९
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- ०२/०२/२०२६

नाव बदलण्याचा जाहिरनामा

अर्जदार श्री.सौ.श्रीमती :- १. हिना शेख अस्लम २.शेख अस्लम शेख इसहाक

प्रकरण :- सिटी सर्व्हे नंबर १८६४ न.प.मि.नं.१५-१०० चे हस्तांतरण बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनामा याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१५-१००) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला --------------------------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊन इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददूल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्धझाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद,अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा :

पुर्व :- सिटी सर्व्हे नं.३२ मधील संतोष संपत रणमळे यांची जागा

पश्चिम :- रस्ता

दक्षिण :- रस्ता

उत्तर :- सिटी सर्व्हे नं.३२ मधील शेख मुबारक कठु यांची जागा

मुख्याधिकारी
नगर परिषद,अंबड

# धर्मसंस्कारातून समाज घडविण्याचा संकल्प

## वीरशैव लिंगायत निवासी धार्मिक संस्कार शिबिराचे उत्साहात उद्घाटन

पिंपरी चिंचवड /प्रतिनिधी

वीरशैव माहेश्वर मंडळ, पुणे जिल्हा तथा ॐ माहेश्वर वैदिक सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या वीरशैव लिंगायत निवासी धार्मिक संस्कार शिबिराचे उद्घाटन पिंपरी चिंचवड येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. समाजातील युवक-युवतींमध्ये धार्मिक, सांस्कृतिक व नैतिक मूल्यांची जपणूक व्हावी तसेच वीरशैव लिंगायत परंपरेचे संस्कार पुढील पिढीपर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या उद्घाटन सोहळ्यास जंगम समाजातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते महेश स्वामी, उद्योजक राजेश चिट्टे, उद्योजक माधव शिनगारे, पंशुल उद्योग समूहाचे अप्पासाहेब जंगम तसेच घाटकोपर माहेश्वर मंडळाचे शिबीर मार्गदर्शक बाळा स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून समाजातील नव्या पिढीला धार्मिक शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व पटवून दिले.



आधुनिकतेच्या युगात संस्कारांची परंपरा जपणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन मान्यवरांनी केले. वीरशैव लिंगायत समाजाची धार्मिक परंपरा, गुरू-शिष्य संस्कृती, शिवतत्त्व आणि मानवतेचा संदेश युवकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य अशा शिबिरांतून प्रभावीपणे होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिबिरामध्ये धार्मिक प्रवचने, वैदिक अध्ययन, शिवतत्त्व मार्गदर्शन, संस्कार वर्ग, सामाजिक प्रबोधन तसेच व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सहभागी विद्यार्थ्यांना अध्यात्मासोबतच सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात करण्यात आले होते. समाजातील विविध स्तरांतील नागरिक, पालक, युवक व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

वीरशैव माहेश्वर मंडळ, पुणे जिल्हा (स्था. १९४६) ही संस्था गेल्या अनेक दशकांपासून समाजहितासाठी विविध धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवत असून समाजहितासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे पुन्हा एकदा या उपक्रमातून अधोरेखित झाले.

## परीक्षा नियंत्रण टेबल टॉप उपकरण वर केंद्र सरकारकडून पेटंट मंजूर

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

फोस्टर डेव्हलपमेंट कॉलेज ऑफ एज्युकेशन सहाय्यक प्राध्यापक, डॉ. बेबी सिंग व सहकार्याने विकसित केलेले 'परीक्षा नियंत्रण टेबल टॉप उपकरण यांना भारत सरकारकडून पेटंट मिळाले आहे.त्यांना मार्गदर्शक डॉ.किलचे यांनी केले.



तर हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सहकार्य डॉ.दांडगे, डॉ.सोनवणे, प्रा.अश्विनी जैवळ आणि डॉ.विपिन सिंग यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.संशोधकांच्या मते, हे पेटंट शैक्षणिक व्यवस्थापनात उपयुक्त असलेल्या नवीन उपायांना प्रोत्साहन देईल.प्रा.डॉ.बेबी सिंग यांनी आत्तापर्यंत अनेक पुस्तके लिहिली असून अनेक पुरस्कारांनीही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. संस्थेचे अध्यक्ष द्वारकाभाऊ पाथ्रीकर, सचिव भाऊसाहेब राजाळे , प्राचार्य डॉ. सुनीता पेटकर यांनी त्यांचे कौतुक केले. दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा.

## त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन, श्रामनेरांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृतिदिनानिमित्त आज दि. २७ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बीड बसस्थानकाजवळील बुद्ध विहार येथे दि बुद्धीष्ट सोसायटी ऑफ इंडिया, शाखा जि. बीड (प.) यांच्या वतीने अभिवादन सभा आयोजित करण्यात आली. यावेळी मुंबई येथील ऐतिहासिक चैत्यभूमी येथे आयोजित विशेष श्रामनेर प्रशिक्षण शिबिरात सहभागी होऊन श्रामनेर झालेल्या बीड जिल्ह्यातील श्रामनेरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयु. महालिंगदादा निकालजे होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आयु. बापू निकाळजे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून दि बुद्धीष्ट सोसायटी ऑफ इंडियाचे राज्य संरक्षण सचिव अमरसिंह ढाका, राज्य संघटक आयु.




डी. एस. नरसिंगे, समता सैनिक दलाचे मेजर जनरल राजाभाऊ आठवले, महिला विभाग बीड जिल्हा (प.) अध्यक्षा आयु. अरुणाताई निसर्गंध, माजी विभागीय सचिव आयु. निसर्गंध गुरुजी, माजी अध्यक्षा आयु. पद्मिनताई गायकवाड, माजी जिल्हाध्यक्ष आयु. विष्णू कांबळे, शिवाजीराव, अनिल डोळस, हिशोबनिस आयु. सोनवणे आप्पा, बीड तालुका संस्कार सचिव प्रा. खैमाडे सर, ता. वडवणी अध्यक्ष प्रा. प्रकाशराव खळगे, बौद्धाचार्य सोनवणे, पुज्य भंते प्रज्ञाबोधी, भंते अश्वघोष, श्रामनेर अमरसिंह ढाका, ड. हणुमंत कांबळे, अनिल बोराडे, कटके गुरुजी, निकाळजे गुरुजी आदी मान्यवर उपस्थित होते.

समता सैनिक दलाचे मेजर जनरल राजाभाऊ आठवले यांनी सर्व स्तरातील आजी-माजी सैनिक, पोलीस कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक, युवक-युवती तसेच एनसीसी विद्यार्थ्यांनी समता सैनिक दलाचा गणवेश परिधान करून २० मार्च २०२७ रोजी होणाऱ्या समता सैनिक दलाच्या शताब्दी संचालनात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

प्रमुख मार्गदर्शक आयु. डी. एस. नरसिंगे यांनी धम्मकार्य हे कुशल कर्म असल्याचे सांगत धम्म सदाचारात रूजणे व समाजात समतेची भावना वाढविणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. प्रकाशराव खळगे यांनी केले. सामूहिक सरणत्रय ग्रहण करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## मायंबा ते मुंबई या आत्मचरित्रास राज्यस्तरीय शब्द गंध साहित्य पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ.शिवाजी घुंगरड यांचा विशेष सन्मान..!

### स्व. अरुणकाका साहित्य नगरीत १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाची उत्साहात सांगता..!!

अहिल्यानगर। प्रतिनिधी

शब्दगंध साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १७ व्या राज्यकारीय शब्दगंध साहित्य संमेलनाची स्व. अरुणकाका साहित्य नगरीत उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. विविध साहित्यिक उपक्रम, चर्चासत्रे, 'असा मी घडलो', पारितोषिक वितरण आणि समारोप सोहळ्याने संमेलनाचा शेवट संस्मरणीव ठाला.यावेळी मायंबा ते मुंबई या आत्मचरित्रास राज्यस्तरीय शब्द गंध साहित्य पुरस्कार बीडचे डॉ.शिवाजी घुंगरड यांचा विशेष पुरस्कार देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण होते. यावेळी स्वागताध्यक्ष सुरेश बनलेडे, संमेलनाध्यक्ष प्रा. संदीप सांगळे, आयएएस अधिकारी गुलावराव खरात, चरिष्ठ तुरंग अधिकारी रवनाथ कानडे, प्राचार्य डॉ. सुरेश पठारे, डॉ. सचिन पांडुळे, रमेश वाघमारे, हर्षल आगळे, शिवाजीराव देवडे, चापूसाहेच भोसले, राजेंद्र उदाने, ज्ञानदेव पांडुळे, सुनील गोसावी, अशोक कानडे, भगवान राऊत राऊत, भारत गाडेकर, तुकाराम गोदकर, जयत्री झरेकर, डॉ. अनिल गर्ने, स्वाती दोबळे, बननराव गिरी, सुभाष सोनवणे, शर्मिला गोलाबी,



राजेंद्र पवार, स्वोद्र दानापुरे, प्रशांत सूर्यवंशी, राजेंद्र चोचे, निरीश जाधव, हरिभाऊ नवन, राजेंद्र फंड, मकरंद घोडके आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शाहीर भारत गाडेकर यांच्या माणसाला वंदन गीताने झाली. त्यानंतर सुनीत गोसावी यांनी प्रस्ताविकातून संमेलनाच्या वाटचालीचा आज्ञावा घेतला. अध्यक्ष योगेश सोमण आणि स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. तसेच शब्दगंध साहित्य परिषदेच्या वतीने स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांना सहपत्नीक सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय समारोप योगेश सोमण यांनी केला.स्वगताध्यक्ष सुरेश बनसोडे यांनी आपले व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला गोसावी आणि अशोक कानडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन ज्ञानदेव पांडुळे यांनी केले.

चौकट...

बीडचे डॉ.शिवाजी घुंगरड सन्मानित

मूळ बीडचे रहिवासी असलेले मुंबई येथील सेंट झेवियर्स गोव्हरमेंट पॉलीटेक्निकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. शिवाजी बापूराव घुंगरड यांचा राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य पुरस्कार देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते विशेष सन्मान करण्यात आला. यामुळे बीड जिल्ह्याची मान आणि शान साहित्य क्षेत्रात वाढली आहे. त्यांच्या या पुरस्काराबद्दल बीड जिल्ह्यासह राज्यभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणकडून कर्तृत्ववान व्यक्तीमत्वांचा गौरव - माजी कुलगुरु डॉ.अशोक ढवण

कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण

अंबाजोगाई (प्रतिनिधी) दिवंगत सहयोगी अधिष्ठाता व विद्यार्थीप्रिय प्राचार्य कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील यांच्या अकराव्या पुण्यस्मरणानिमित्त स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्कारांचे वितरण बुधवार, दिनांक २७ मे रोजी केज तालुक्यातील उंदरी येथे करण्यात आले. या निमित्ताने मान्यवरांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा आणि पूर्वसंध्येला खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम ही आयोजित करण्यात आला होता.

बुधवार, दिनांक २७ मे रोजी सकाळी वृक्ष पुजन व संवर्धन करण्यात येवून नियोजित कार्यक्रमास सुरूवात झाली. या मेळाव्याचे उद्घाटक व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.अशोक ढवण (माजी कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.) हे होते. तर यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.उदय खोडके (माजी संचालक शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.), डॉ.अशोक थोरात (संचालक, महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, मुंबई.), राहुल सोनवणे (जिल्हाध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, बीड.), डॉ.अनिलकुमार भिकाणे (माजी विस्तार संचालक, महाराष्ट्र राज्य पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ.), ज्येष्ठ पत्रकार अरूण समुद्रे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रारंभी मान्यवरांनी दीपप्रज्ज्वलन आणि प्रतिमापूजन केले. त्यानंतर स्मृती प्रतिष्ठाणकडून मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक करताना बाळासाहेब सुर्यवंशी यांनी प्रतिष्ठानच्या कार्याचा विस्तृत आढावा घेतला. दिवंगत सासरे, सहयोगी अधिष्ठाता व विद्यार्थीप्रिय प्राचार्य कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील यांच्या व्यक्तीमत्वातील विविध पैलू, स्वभाव वैशिष्ट्ये उपस्थितांसमोर ठेवली. समाजाचे आपण काही देणे लागतो. या भावनेतून हा कार्यक्रम घेण्यामागे तरूण पिढीला दिशा व प्रेरणा मिळावी हा विधायक हेतू आहे. नातेबंध, सुसंस्कार वृद्धींगत करून संवेदनशील व परिवर्तनशील समाज निर्मितीसाठी हा उपक्रम मागील ११ वर्षांपासून आयोजित करीत आहोत असे सुर्यवंशी (लातूर) यांनी नमूद केले. प्रमुख अतिथी डॉ.उदय खोडके यांनी ठोंबरे परिवार कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याचा गौरव करते. हा उपक्रम प्रबोधनपर आहे. कै.डॉ.बालासाहेब ठोंबरे सर हे समाजस्नेही व्यक्तीमत्व होते. त्यांनी समाज, विद्यार्थी व शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून कार्य केले. उंदरी गाव आदर्श व्यक्तींची खाण आहे. समाजात सकारात्मक परिवर्तन करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. आई ही संस्काराची शाळा व कष्टाचे विद्यापीठ असते असे प्रतिपादन डॉ.खोडके यांनी केले. यावेळी अध्यक्षीय समारोप



करताना उद्घाटक माजी कुलगुरू डॉ.अशोक ढवण यांनी सांगितले की, ठोंबरे परिवाराशी आमचा जुना स्नेहबंध आहे. आई - वडिलांची सेवा करणारे, बंधू प्रेमाचा संस्कार रूजविणारे, सेवाभाव जोपासणारे, माणुसकी जीवंत ठेवणाऱ्या. एकत्र कुटुंब पद्धतीचा आदर्श टिकवून ठेवणाऱ्या, सेंद्रिय शेतीतील कार्य व प्रयोगशील शेतकरी बांधवांना प्रेरणा व बळ देणारे, पत्रकारिता, संगीत, शिक्षण, समाजसेवा, आरोग्य, कृषी, साहित्य, सहकार, विधी, प्रशासन, उद्योग, व्यवसाय तसेच राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक बांधिलकी जोपासून विविध क्षेत्रात निस्वार्थपणे व समर्पित भावनेतून कार्य करणाऱ्या आदर्श व्यक्तिमत्वांचा ठोंबरे कुटुंबिय दरवर्षी पुरस्कार देऊन सन्मानित करते हे अभिनंदनीय कार्य आहे. हे प्रतिष्ठान चांगले उपक्रम राबवून कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे यांचे समर्पित कार्य व संस्काररूपी विचार पुढे नेत आहे. हा पुरस्कार सोहळा महाराष्ट्रात बीड जिल्ह्याचा नांवलौकिक वाढविणारा आहे असे गौरवोद्गार डॉ.ढवण यांनी काढले. यावेळी संचालक डॉ.अशोक थोरात, जिल्हाध्यक्ष राहूल सोनवणे, डॉ.अनिलकुमार भिकाणे यांनीही समायोचित मार्गदर्शन केले. तर युवा नेते रणजित आडसकर यांनी पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले.

# नेकनूर ग्रामपंचायतीवर महिला व नागरिकांचा तीव्र संताप

## सरपंच गायब, सदस्यही वैतागले..!

नेकनूर /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक आणि महत्त्वाचे गाव असलेल्या नेकनूरमध्ये सध्या ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. गावातील मूलभूत सोयी-सुविधांचा बोजवारा उडाल्याने त्रस्त झालेल्या महिला आणि ग्रामस्थांनी अखेर सहनशीलतेचा अंत होऊन ग्रामपंचायत कार्यालयावर धडक मोर्चा काढला. मात्र, नागरिकांना उत्तरे देण्यासाठी आणि त्यांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी खुद्द सरपंचच ग्रामपंचायतीमधून गायब असल्याने आंदोलकांचा संताप आणखीच अनावर झाला.



या मोर्चामुळे नेकनूरमधील राजकीय आणि सामाजिक वातावरण कमालीचे तापले असून, सरपंच नक्की गेले कुठे ? असा सवाल आता विचारला जात आहे.

मोर्चामध्ये सहभागी झालेल्या महिला आणि नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनासमोर गावातील अत्यंत गंभीर प्रश्न मांडले:रस्त्यांची दुरवस्था: गावातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांची चाळण झाली असून, पावसाळ्यापूर्वीच रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे.

तुंबलेल्या नाल्या आणि आरोग्य: नाल्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने ठिकठिकाणी कचरा आणि सांडपाणी साचले आहे. यामुळे दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न: उन्हाळ्याच्या दिवसांत नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तीव्र टंचाईचा सामना करावा लागत आहे. नियमित आणि शुद्ध पाणीपुरवठा करण्याची मागणी महिलांनी लावून धरली आहे.

गल्लीबोळांतील अतिक्रमणाचा विळखा: गावातील मुख्य रस्त्यांपेक्षाही आता अंतर्गत भागांत परिस्थिती बिकट झाली आहे. गावातील गल्ली गल्लीत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले असून, यामुळे अंतर्गत रस्ते कमालीचे अरुंद झाले आहेत. गल्लीबोळांतून साधे चालणे किंवा वाहने नेणेही कठीण झाले असून, हे गल्ली गल्लीतील अतिक्रमण तात्काळ हटवण्यात यावे, अशी आक्रमक मागणी नागरिकांनी केली आहे.

**सरपंच कोणाचेच ऐकत नाहीत; थेट बरखास्तीची मागणी..!**

या आंदोलनादरम्यान ग्रामपंचायतीमधील अंतर्गत राजकीय खदखदही आता चव्हाट्यावर आली आहे. केवळ सामान्य नागरिकच नाही, तर आता ग्रामपंचायतीचे सदस्यही सरपंचांच्या कारभाराला पूर्णपणे कंटाळले आहेत.

संतापलेल्या सदस्यांनी थेट आरोप केला आहे की, सरपंच आम्हाला (सदस्यांना) कसलाही भाव देत नाहीत. थेट जनतेतून (लोकांमधून) निवडून आल्यामुळे ते स्वतःला सर्वस्वी समजतात आणि कोणाचेच ऐकत नाहीत. सरपंचांच्या या हुकूमशाही आणि मनमानी कारभाराला वैतागून आता 'सरपंच पद बरखास्त करण्यात यावे', अशी आक्रमक मागणी खुद्द ग्रामपंचायत सदस्यांनीच लावून धरली आहे.

### प्रशासनाला दिला इशारा

आम्ही कर भरूनही जर आम्हाला रस्ते, पाणी, आणि गल्लीबोळांतील स्वच्छता-अतिक्रमणासारख्या मूलभूत गरजांसाठी मोर्चा काढावा लागत असेल, तर या सत्तेचा काय फायदा ? असा संतप्त सवाल मोर्च्यातील महिलांनी उपस्थित केला. सरपंच जाणीवपूर्वक जनतेला आणि सदस्यांना तोंड देणे टाळत असल्याचा आरोपही आंदोलकांनी केला. जर पुढील काही दिवसांत रस्त्यांची दुरुस्ती, नाल्यांची सफाई, गल्ली गल्लीतील अतिक्रमण हटवणे आणि या राजकीय गोंधळावर ठोस निर्णय झाला नाही, तर यापेक्षाही तीव्र आणि बेमुदत ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा नेकनूरवासीयांनी व सदस्यांनी दिला आहे.

# राज्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचे २ हजार ८०० कोटी रुपये थकवले

## मदत नको तर फौजदारी गुन्हा दाखल करा - ॲड. अजित देशमुख

बीड /प्रतिनिधी

शेतकऱ्यांचा ऊस त्याच्या शेतातून नेल्यानंतर चौदा दिवसात उसाचे संपूर्ण बिल देण्याची तरतूद शुगर केन कंट्रोल क्ट १९६६ मध्ये आहे. मात्र राज्यातील २०९ कारखान्यांनी २०२५/२६ या गाळप वर्षांमध्ये गाळप केलेल्या उसाचे २८००कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले नसल्याची गंभीर बाब जनआंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम. देशमुख यांनी समोर आणली आहे.

राज्यात सन २०२५/२६ या गाळप वर्षांमध्ये २०९ कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप केले. या २०९ कारखान्यांची दैनंदिन गाळप क्षमता नऊ लाख सत्तर हजार आठशे बारा मेट्रिक टन एवढी आहे. तर या हंगामामध्ये या कारखान्यांनी एकूण दहा लाख बत्तीस हजार सातशे दहा मेट्रिक टन उसाचे गाळप केले आहे.

शासनाने गाळप हंगाम सुरू होत असताना कारखान्यांना गाळप परवाना देत असताना त्यात एफ. आर. पी. ची रक्कम मुदतीत दिली जाईल याची हमी घेतलेली असते. त्याचप्रमाणे कायद्यातील तरतूद देखील याप्रमाणेच आहे. मात्र कारखाने बंद झाल्यानंतर काही महिने लोटले तरी शेतकऱ्यांचे २८०० कोटी रुपये अजूनही दिलेले नाहीत.

त्यामुळे आता याबाबत देशमुख यांनी राज्यातील एफ.आर.पी. मुदतीत न देणाऱ्या साखर कारखान्यांच्या संचालकांवर गुन्हे दाखल करून विलंब कालावधीची रक्कम शेतकऱ्यांना पंधरा टक्के व्याज असलेल्या देण्याची मागणी केलेली आहे. यावर साखर आयुक्तालय काय निर्णय घेते याकडे शेतकऱ्यांची लक्ष वेधले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांमध्ये एकजूट नाही. शेतकरी आपल्या हक्का प्रति भांडत नाही. शेतकऱ्यांसाठी कडे आंदोलनासाठी वेळ नाही. या सर्व बाबी साखर सम्राट यांना माहित आहेत. म्हणून हे सर्व घडत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी जागे होऊन आपापल्या कारखानदारांना एकत्र येऊन जाब विचारावा.आता हे साखर कारखानदार केंद्र सरकारच्या सहकार विभागाकडे जाऊन या ही रक्कम देण्यासाठी पैसे मागत आहेत. ही बाब अत्यंत चुकीची असून सर्व राजकारणी एकसारखे असून शेतकऱ्यांना बुडवण्याचे काम सातत्याने होत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने साखर कारखान्यांना मदत करू नये, असे निवेदन ड. अजित देशमुख यांनी केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांना पाठविले आहे. या कारखानदारांवर गुन्हे दाखल करून रक्कम व्याजासह द्यावी, असेही ड. देशमुख यांनी म्हटले आहे.



## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना अभिवादन

बीड / जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात तहसीलदार विनोद रणवरे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयासह इतर विभागाच्या अधिकारी- कर्मचाऱ्यांनी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

## पेट्रोल डिझेल रॉकेल गॅस दरवाढ तात्काळ रद करा - वसंत मुंडे

मुंबई /प्रतिनिधी

आरएसएसच्या विचारधारेचे भाजपचे केंद्र व राज्यातील त्रिमूर्ती सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांमुळे पेट्रोल, डिझेल रॉकेल व घरगुती गॅसच्या दरामध्ये सातत्याने वाढ होत असून इंधन टंचाई प्रचंड वाढलेली आहे. यामुळे केलेली दरवाढ तात्काळ रद्द करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाचे वसंत मुंडे यांनी केली आहे.



सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार, विद्यार्थी व मध्यमवर्गीय जनतेचे जीवन जगणे अत्यंत कठीण झाले आहे. महागाईमुळे जनतेमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. अन्यायकारक दरवाढीच्या निषेधार्थत राज्यभर काँग्रेस कार्यकर्ते आंदोलन करत आहे. दरवाढ रद्द करण्याचे आदेश केंद्र व राज्य सरकारने तात्काळ काढावेत व सामान्य जनतेला न्याय द्यावा अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे,सुरेश पाटील खेडे, प्रकाश जाधव, कुंदा सोनवणे, शरद सोनवणे इत्यादी कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत आज शिवसेनेचा शिवसंवाद दौरा

बीड /प्रतिनिधी

शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेनेचे संसदीय गटनेते व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वात राज्यभर सुरू असलेल्या महाराष्ट्रव्यापी शिवसंवाद दौऱ्या अंतर्गत बीड जिल्ह्यातील गेवराई व आष्टी विधानसभा मतदारसंघांची संयुक्त बैठक शुक्रवार, दि. २९ मे रोजी पाटोदा येथे आयोजित करण्यात आली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण मानली जात आहे. या बैठकीला सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख अँड चंद्रकांत नवले आणि अँड स्वप्नील गलधर यांनी केले आहे.

शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीला गती देणे, स्थानिक पातळीवरील प्रश्नांवर चर्चा करून कार्यकर्त्यांना दिशा देणे, तसेच आगामी निवडणुकांसाठी प्रभावी रणनीती निश्चित करणे हा या बैठकीमागील प्रमुख उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे. यावेळी मतदारयादी पुनरिक्षण (डखठ), बूथस्तरीय नियोजन, जनसंपर्क अभियान, नव्या कार्यकर्त्यांचा सहभाग वाढविणे आणि पक्ष विस्तार यांसारख्या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.



## गेवराई-आष्टी विधानसभा बैठकीत संघटन बळकटीसह निवडणूक रणनीतीवर चर्चा

विशेषतः विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने गावपातळीवरील संघटन मजबूत करण्यावर भर दिला जाणार असून, प्रत्येक बूथवर पक्षाची ताकद वाढविण्यासाठी आवश्यक सूचना व मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती पक्ष सूत्रांनी दिली. महिला आघाडी, युवासेना, बी.एल.ए.-२, शाखाप्रमुख आणि विविध पदाधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांचेही यावेळी नियोजन केले जाणार आहे.

बैठकीला गेवराई व आष्टी विधानसभा क्षेत्रातील शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी, शाखाप्रमुख, महिला आघाडीच्या पदाधिकारी, युवासेना कार्यकर्ते, बी.एल.ए.-२ तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे अपेक्षित आहे. पक्षाच्या आगामी राजकीय वाटचालीसाठी हा संवाद दौरा निर्णायक ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

सदरील बैठक आज शुक्रवार दिनांक २९ मे रोजी दुपारी १२ वाजता रोहिदास मंगल कार्यालय पाटोदा येथे होणार आहे.या बैठकीस वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाप्रमुख अँड. चंद्रकांत नवले आणि स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

# साक्षीपुरावे अपुरे ठरल्याने दत्तात्रेय मुंडे यांची निर्दोष मुक्तता

## पिंपळनेर पोलिस ठाण्यात दाखल विनयभंग प्रकरणात न्यायालयाचा निर्णय

बीड /प्रतिनिधी

मौजे ताडसोन्ना येथील दत्तात्रेय उर्फ दत्ता रामभाऊ मुंडे यांच्याविरुद्ध पिंपळनेर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या विनयभंग प्रकरणात न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत त्यांची निर्दोष मुक्तता केली आहे. नियमित फौजदारी खटला क्रमांक ४६७/२०२३ मध्ये सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने हा निकाल दिला. आरोपीची बाजू भक्कमपणे ड. प्रभाकर आंधळे, ड. संग्राम तुपे, ड. सचिन केकान आणि ड. राजेश चोले यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.



सदर प्रकरणात फिर्यादी पक्षाकडून एकूण सहा साक्षीदारांची तपासणी करण्यात आली होती. मात्र, साक्षीदारांनी न्यायालयात दिलेले जबाब, पोलिसांनी केलेला तपास तसेच सादर करण्यात आलेले साक्षीपुरावे यामध्ये आरोप सिद्ध होण्यास आवश्यक ठोस पुरावे उपलब्ध नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे आरोपी दत्तात्रेय उर्फ दत्ता रामभाऊ मुंडे, रा. ताडसोन्ना यांची दिनांक २६ मे २०२६ रोजी न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

या प्रकरणात बचाव पक्षाच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने उपलब्ध पुरावे व साक्षींचा सखोल विचार करून हा निर्णय दिला.न्यायालयाच्या या निर्णयानंतर मुंडे यांच्या समर्थकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, कायदेशीर प्रक्रियेनंतर सत्य समोर आल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# हरिभाऊ सोळंखे यांना प्रतिष्ठित मौलाना अबुल कलाम आझाद स्मृती राष्ट्रनिष्ठा व सामाजिक एकता जीवनगौरव पुरस्कार जाहीर!

बीड (प्रतिनिधी) गेल्या चार दशकांहून अधिक काळ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या विचारसरणीशी एकनिष्ठ राहून पक्षसंघटन बळकट करणारे, देशातील एकता, अखंडता (हिंदू-मुस्लिम सलोखा) टिकवून ठेवण्यासाठी आयुष्यभर प्रामाणिक लढा देणारे सादोळा (ता. माजलगाव) येथील सामाजिक व राजकीय कार्यकर्ते तथा ज्येष्ठ अभ्यासक हरिभाऊ भगवानराव सोळंखे यांना यंदाचा सर्वोच्च आणि अत्यंत मानाचा मौलाना अबुल कलाम आझाद स्मृती 'राष्ट्रनिष्ठा व सामाजिक एकता' जीवनगौरव पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त आणि ६ व्या वर्षात पदार्पण सोहळ्याचे औचित्य साधून 'युवा लोकमित्र परिवार'यांच्या वतीने या ऐतिहासिक पुरस्काराची अधिकृत घोषणा करण्यात आली.साप्ताहिक युवा लोकमित्र' आणि 'युवा लोकमित्र परिवार' यांच्या संयुक्त विद्यमाने समाजात आणि राजकीय-सामाजिक क्षेत्रात तत्त्वाशी प्रामाणिक राहून आदर्शवत कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ नेतृत्वाचा गौरव केला जातो. उच्चस्तरीय पुरस्कार निवड समितीने हरिभाऊ सोळंखे यांच्या ४० वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय, सामाजिक आणि वैचारिक प्रवासाची या सर्वोच्च सन्मानासाठी एकमुखाने निवड केली आहे.

एम. ए. (इतिहास) सारखी उच्च शैक्षणिक पात्रता असलेले आणि व्यवसायाने शेतकरी असलेले हरिभाऊ सोळंखे यांचा राजकीय प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांनी १९८७ ते १९९५ या काळात 'छडणख' चे माजलगाव तालुकाध्यक्ष म्हणून काम करत असताना तरुण विद्यार्थ्यांची मोठी फळी निर्माण केली. त्यानंतर १९९५ ते २००१ युथ काँग्रेस तालुकाध्यक्ष, २००१ ते २०१२ तब्बल ११ वर्षे काँग्रेस पक्षाचे माजलगाव तालुकाध्यक्ष आणि २०१२ ते २०१५ या काळात बीड जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी अत्यंत यशस्वीपणे सांभाळली.सादोळा ग्रामपंचायत सदस्य ते सादोळा जिल्हा परिषद गटातून जिल्हा परिषद सदस्य म्हणून त्यांनी ग्रामीण भागाचा विकास केला. तसेच संजय गांधी निराधार तालुका कमिटीचे सदस्य म्हणून अनेक वर्ष निराधार व गरजू नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला. शेतकरी पीक कर्ज आणि पीक विम्याच्या कठीण प्रश्नांवर त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक आंदोलने उभारली आहेत.

हरिभाऊ सोळंखे हे केवळ राजकारणी नसून इतिहासाचे गाढे अभ्यासक आहेत. काँग्रेस पक्षाचा खरा आणि गौरवशाली इतिहास तरुणांसमोर मांडण्याचे मोठे काम ते फेसबुकच्या माध्यमातून करत आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिलेल्या 'द्वेषाच्या बाजारात प्रेमाचे दुकान उघडण्याच्या' आवाहनाला ते आपल्या लेखणीतून जनमानसात जागृत करत आहेत.विशेष म्हणजे, देशाचे लाडके पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर त्यांनी लिहिलेले पुस्तक सध्या प्रकाशनाच्या मार्गावर आहे,

सलोखा आणि एकतेचे दूत: हरिभाऊ सोळंखे

हरिभाऊ सोळंखे यांनी समाजात सर्व धर्मीयांमध्ये बंधुभाव आणि सलोखा कायम राहावा यासाठी नेहमीच महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. कोणत्याही परिस्थितीत सामाजिक वीण विस्कटणार नाही आणि देशाची अखंडता टिकून राहील, यासाठी त्यांनी दिलेले योगदान सर्वसमावेशक समाजासाठी आदर्शवत आहे. त्यांच्या याच निस्पृह सेवेचा गौरव 'युवा लोकमित्र' परिवारातर्फे करण्यात येत आहे.

२० जून रोजी भव्य सोहळ्यात वितरण

हा दिमाखदार आणि वैचारिक गौरव सोहळा शनिवार, २० जून २०२६ रोजी संध्याकाळी ०६:०० वाजता 'ताज पॅलेस', कादरपुरा, बार्शीनाका, बीड येथे अत्यंत उत्साहात पार पडणार आहे. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज व मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याच गरिमामयी उपस्थितीत हरिभाऊ सोळंखे यांच्या प्रदीर्घ राष्ट्रनिष्ठेचा आणि वैचारिक लढ्याचा विशेष गौरव करण्यात येईल.

हरिभाऊ भगवानराव सोळंखे यांचे कार्य केवळ बीड जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण राज्यासाठी मार्गदर्शक आहे. ४० वर्षे एकाच विचारसरणीशी प्रामाणिक राहणे, सामाजिक एकता टिकवण्यासाठी कष्ट घेणे आणि



आजच्या काळात फेसबुक व पुस्तकांच्या माध्यमातून इतिहासाची पुनर्मांडणी करणे ही कौतुकास्पद गोष्ट आहे. थोर स्वातंत्र्यसेनानी व काँग्रेसचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या नावाने त्यांना जीवनगौरव पुरस्कार देताना युवा लोकमित्र परिवाराला सार्थ अभिमान वाटत आहे.

- शेख ताहेर जाफर (संपादक, साप्ताहिक युवा लोकमित्र, बीड)

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल हरिभाऊ सोळंखे यांच्यावर बीड आणि माजलगाव जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी बांधव, वाचक आणि विविध सामाजिक स्तरातून अभिनंदनाचा उत्स्फूर्त वर्षाव होत आहे.

# लोकशाही बळकट करण्यासाठी मतदार मॅपिंग आवश्यक - श्रावण पा. भिलवंडे

नायगाव / श्याम पाचोंडे

नायगाव विधानसभा मतदार संघातील प्रत्येक पात्र मतदाराने आपले मतदार मॅपिंग ३० मे २०२६ पूर्वी तात्काळ पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते श्रावण पाटील भिलवंडे यांनी केले आहे. मतदार मॅपिंगची अंतिम मुदत ३० मे असल्याने नागरिकांनी कोणतीही दिरंगाई न करता प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन केले आहे.

निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार सुरू असलेली ही प्रक्रिया मतदार याद्या अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी महत्त्वाची मानली जात आहे. भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणालाही अडचणी येऊ नयेत तसेच एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी मॅपिंग आवश्यक असल्याचे श्रावण पाटील भिलवंडे यांनी सांगितले.

सध्या नायगाव विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये मतदार मॅपिंगचे काम मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी प्रक्रियेबाबत अपुरी माहिती, मोबाईल क्रमांक लिंक नसणे, ओटीपी पडताळणीतील अडचणी तसेच तांत्रिक कारणांमुळे प्रक्रिया रखडत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी वेळ न लावता आपल्या मोबाईलद्वारे किंवा संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मतदार मॅपिंग करताना मोबाईल क्रमांक लिंक करणे, ओटीपी पडताळणी, कुटुंबातील सदस्यांची माहिती अद्ययावत करणे, पत्ता



व वैयक्तिक तपशील तपासणे या प्रक्रिया पूर्ण कराव्या लागत आहेत. ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना या प्रक्रियेची माहिती नसल्यामुळे बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) यांनी नागरिकांना योग्य मार्गदर्शन करून सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

मतदार याद्या अचूक राहण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराची नोंद व्यवस्थित असणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत पद्धतीनेच मॅपिंग पूर्ण करावे. ३० मे २०२६ ही शेवटची तारीख असल्याने सर्वांनी तातडीने प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन भिलवंडे यांनी केले.

लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदार महत्त्वाचा असून एकही नागरिक मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी जागरूक राहून स्वतःचे तसेच कुटुंबातील सदस्यांचे मतदार मॅपिंग त्वरीत पूर्ण करावे, असे आवाहन भाजपचे नेते श्रावण पाटील भिलवंडे यांनी केले आहे.

## प्रशासनाच्या 'त्या' निर्णयाविरोधात वाघोली ग्रामस्थ आक्रमक

# आज शेवगाव पंचायत समितीसमोर सामूहिक मुंडण व जनआक्रोश आंदोलन

शेवगाव, केज/ प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०२५-२६ च्या तालुकास्तरीय निकाल प्रक्रियेत पारदर्शकता न राखता आदर्श ग्रामपंचायत वाघोली ता. शेवगाव यांना जाणीवपूर्वक डावलल्याचा गंभीर आरोप करत ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. या निषेधार्थ शुक्रवार दिनांक २९ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता शेवगाव पंचायत समिती कार्यालयासमोर सामूहिक मुंडण व जनआक्रोश आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे.यासंदर्भातील अधिकृत निवेदन गटविकास अधिकारी यांना देण्यात आले असून, प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

'माझी वसुंधरा' विजेता गाव ठरले डावललेले..!

'माझी वसुंधरा अभियान २.०/३.०' अंतर्गत प्रथम पुरस्कार प्राप्त करून राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या वाघोली ग्रामपंचायतीला तालुकास्तरीय निकालात कोणताही क्रमांक देण्यात आला नसल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. ग्रामस्थांच्या मते, गावाने स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, जलव्यवस्थापन, ग्रामविकास आणि लोकसहभागाच्या माध्यमातून राज्यपातळीवर आदर्श निर्माण केला असतानाही तालुका प्रशासनाने हितसंबंध जपत गावावर अन्याय केला आहे.

राज्य पातळीवर आदर्श ठरलेल्या आमच्या गावाला तालुका स्तरावर जाणीवपूर्वक डावलण्यात आले. आमच्या कामाचे खच्चीकरण करून भविष्यातील वाटचालीला खिळ घालण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे. हा अन्याय वाघोली ग्रामस्थ कदापिही सहन करणार नाहीत, असा




संतप्त सूर लोकनियुक्त सरपंच सौ. सुस्मिता उमेश भालसिंग यांनी व्यक्त केला.

### केज येथेही सोमवारी आंदोलनाची तयारी...

वाघोली ग्रामस्थांच्या आंदोलनाला पाठिंबा देत केज येथील गटविकास अधिकारी हे या समितीमध्ये परीक्षक असल्यामुळे यांच्या निषेधार्थ सोमवारी केज येथे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली आहे. पंचायत राज अभियानातील निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता राखावी आणि गुणवत्तापूर्ण काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना न्याय द्यावा, अशी मागणी या आंदोलनातून करण्यात येणार आहे.

सामूहिक मुंडण आंदोलनाचा इशारा

प्रशासनाच्या भूमिकेविरोधात ग्रामस्थांनी सामूहिक मुंडण आंदोलनाचा मार्ग स्वीकारला असून, या आंदोलनात सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच शेकडो ग्रामस्थ सहभागी होणार असल्याचे समजते. आंदोलनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधून घेत न्याय मिळवण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

अन्यथा सर्व जबाबदारी प्रशासनाची

या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीस आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांना प्रशासनच जबाबदार राहील, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती तहसीलदार शेवगाव, पोलीस निरीक्षक शेवगाव, मुख्य कार्यकारी अधिकारी अहिल्यानगर आणि जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांनाही पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.



बीड - स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटीलसह डॉ. योगेशभैया क्षीरसागर,नगरसेवक अँड. नागेश तांबारे,नगरसेवक जगदीश गुरखुदे, नगरसेवक धोंगडे,मुख्याध्यापक कृष्णा जोशी, साळुंखे सर, बी.बी. वैद्य, देशपांडे, जोशीसह सावरकर प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबाजोगाई येथील घरफोडी करणा-या सराईत आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या

बीड /प्रतिनिधी

पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर हद्दीमध्ये दि. १३.०५.२०२६ रोजी ०८.०० वा ते दि. १८.०५.२०२६ रोजीच्या २१.०० वाचे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने प्रभाकर रघुनाथ मुंडे रा. अंबाजोगाई यांच्या बंद घराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून घरातील सोन्याचे दागिने चोरून नेले होते. त्यावरून दि.१९.०५.२०२६ रोजी अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा क्रमांक १८२/२०२६ कलम ३०५,३३१(३),(४) इछड अन्वये दाखल होता. सदर गुन्ह्याचा समातंर तपास पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर व स्थानिक गुन्हे



शाखा करीत होती.

दि.२७.०५.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा बीड येथील पोउपनि सुशांत सुतळे, पोह/मारूती कांबळे, पोह/रामचंद्र केकान, पोह/विष्णु सानप, पोह/गोविंद भताने, पोअ/सचिन आंधळे असेंना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा अंबाजोगाई येथील सराईत गुन्हेगार शिवम जनक कसबे रा. सैनिक कॉलनी मोरेवाडी ता. अंबाजोगाई याने व त्याचे इतर दोन साथीदाराने मिळुन केला आहे. सदरचे आरोपी हे सध्या यशवंतराव चव्हाण चौका जवळ मोरेवाडी जाणारे रोडच्या बाजुस गप्पा मारत बसले आहेत. मिळालेली माहितीच्या ठिकाणी नमुद पथकाने छापा मारला असता त्याठिकाणी सराईत गुन्हेगार १) शिवम जनक कसबे रा. सैनिक कॉलनी मोरेवाडी ता. अंबाजोगाई व दोन विधीसंघर्ष बालक मिळुन आले. त्यांना विश्वासात घेवुन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली देवून गुन्ह्यातील चोरून नेलेल्या मुद्देमालापैकी १० ग्रम वजनाचे सोन्याचे दागिने (किमंत अंदाजे १,५०,०००/- रूपये) काढून दिले आहेत. ते जप्त करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास पोउपनि आनंद शिंदे अंबाजोगाई शहर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.प्र. पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मँडम, सहा. पोलीस अधीक्षक श्री. ऋषीकेष शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोनि शिवाजी बंटेवाड, पोस्टे अंबाजोगाई शहरचे प्रभारी शरद जोगदंड, पोउपनि सुशांत सुतळे, पोह/मारूती कांबळे, पोह/रामचंद्र केकान, पोह/विष्णु सानप, पोह/गोविंद भताने, पोह/युनूस बागवान, पोह/गोविंद राख, पोआ/सचिन आंधळे, विकी सुरवसे, व पोह/पाडुरंग काळे पोस्टे अंबाजोगाई शहर असेंनी मिळुन केलेली आहे.

# शिवाजीनगर पोलिसांचे दिवसभर धाडसत्र

## बकरी ईदच्या दिवशी दारूविक्रीचा मोठा मनसुबा उधळला, जुगाराच्या अड्ड्यांसह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त !

बीड /प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बल्लाळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २७ मे २०२६ रोजी दिवसभर हद्दीत विविध ठिकाणी धडक धाडसत्र राबवण्यात आले. या विशेष मोहिमेत पोलिसांनी हद्दीतील एकूण चार मटका जुगाराच्या अड्ड्यांवर छापे टाकले, तसेच इंदिरा नगर परिसरात देशी दारूच्या मोठ्या साठ्यावर अत्यंत यशस्वी रेड केली. या पाचही धडक कारवायांमध्ये पोलिसांनी एकूण पाच आरोपीना रंगेहात अटक केली असून त्यांच्याकडून दारूसाठा, वाहने, लॅपटॉप आणि रोख रकमेसह एकूण ३,२१.१२०/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



या मोहिमेतील सर्वात महत्त्वाची आणि मोठी कारवाई नाट्यगृहाजवळ, इंदिरा नगर परिसरात करण्यात आली. आज बकरी ईद सण असल्याने शासनाचा अधिकृत 'ड्राय डे' (दारूबंदीचा दिवस) आहे. याच संधीचा फायदा घेऊन सणाच्या दिवशी चढ्या दराने चोरटी दारू विक्री करण्यासाठी आरोपीने हा मोठा साठा करून ठेवला होता. मात्र, या बेकायदेशीर मनसुब्याची गोपनीय बातमीदाराकडून पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली. पोलीस पथकाने तातडीने रात्री २२:५० वाजण्याच्या सुमारास येथील एका मोकळ्या पत्र्याच्या शेडवर अचानक छापा टाकला आणि बकरी ईदच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर दारू विकण्याचा आरोपीचा डाव पूर्णपणे उधळून लावला. या कारवाईत पोलिसांना 'बॉबी संत्रा आणि टँगो पंच' कंपनीचे एकूण १२ बॉक्स म्हणजेच १,२०० प्लास्टिक दारूच्या बाटल्या जप्त करण्यात यश आले असून आरोपी आकाश सदाशिव वडमारे (रा. इंदिरा नगर, बीड) याच्याविरुद्ध कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दारूच्या या मोठ्या रेडसोबतच पोलिसांनी काल दिवसभरात हद्दीत ठिकठिकाणी चालू असलेल्या अवैध मटका आणि ऑनलाइन जुगाराच्या अड्ड्यांवरही छापे टाकून चार जुगार चालकांना रंगेहात पकडले. यामध्ये नगर नाका येथील हॉटेल ऑलिव्हसमोरून आरोपी अमीर खान नादेरखान पठाण याला, तर लाईफ लाईन हॉस्पिटल कॅनाल रोड परिसरातून शेख हुजेर शेख रियाज याला 'कल्याण' नावाचा मटका जुगार खेळवताना अटक करण्यात आली. या दोन्ही आरोपींकडून अनुक्रमे १,१०,४४०/- रुपये आणि १,०८,२६०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, ज्यामध्ये दोन विना नंबरच्या दुचाकी वाहनांचा (स्प्लेंडर प्लस आणि ॲक्सेस स्कुटी) समावेश आहे. त्याचप्रमाणे नगर रोडवरील जायका हॉटेलच्या बाजूला मटका आकडे लिहिणाऱ्या शेख युसुफ शेख नझीर (रा. बालेपीर, बीड) या आरोपीला पोलिसांनी ४२,७२०/- रुपयांच्या मुद्देमालासह ताब्यात घेतले. तर पालवण चौक येथील हॉटेल डी राजच्या बाजूला पत्र्याच्या शेडसमोर लॅपटॉपवर ऑनलाइन 'चक्री' नावाचा जुगार खेळवणाऱ्या लक्ष्मण आबा पवार (वय २९, रा. गोविंद नगर, बीड) या आरोपीला पथकाने धाड टाकून अटक केली. या ऑनलाइन जुगार प्रकरणी पोलिसांनी आरोपीकडून ५४,७००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, त्यात एक एच.पी कंपनीचा लॅपटॉप, की बोर्ड आणि माउस जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या या चारही जुगार चालकांविरुद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदर सर्व यशस्वी कारवाया पोलीस निरीक्षक बल्लाळ साहेब यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पोउपनि सागर सोत्रे, सफौ राऊत, पोह आघाव, पोह मराडे, पोह घोलप, पोह सुरेवाड, पोशि गिरी, पोशि राठोड, पोशि रहाडे, पोशि राडकर, पोशि आगलावे, पोशि घटमाळ, पोशि जाधव, पोशि कांदे व मपोशि शिंदे यांच्या वेगवेगळ्या पथकांनी बजावली असून पुढील कायदेशीर तपास सुरू आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सण-उत्सवाच्या काळात शांतता भंग करणारे कोणतेही अवैध धंदे खपवून घेतले जाणार नाहीत आणि अशा गुन्हेगारांवर यापुढेही कडक कारवाई केली जाईल, असा सज्जड इशारा पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.



## सामाजिक ऐक्य व बंधुभावाचे पुन्हा दर्शन घडवत

# पात्रुडमध्ये बकरी ईद उत्साहात साजरी

माजलगाव /प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पात्रुड गावाने सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि परंपरेचा सुंदर वारसा कायम जपला असून बकरी ईदच्या निमित्ताने पुन्हा एकदा गावातील एकोप्याचे दर्शन घडले. पात्रुड येथील ईदगाह परिसरात हजारो मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात ईदची नमाज अदा केली.

विशेष म्हणजे, पात्रुड गावात सर्व धर्मीय नागरिक प्रत्येक सण एकोप्याने आणि आनंदात साजरा करत असल्याची परंपरा कायम आहे. याच सामाजिक सलोख्याचे दर्शन यावेळीही ईदच्या उत्सवात पाहायला मिळाले. नमाज पठणानंतर ईदगाह परिसरात मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी माजी सरपंच एकनाथ मस्के यांनी मुस्लिम बांधवांना बकरी ईदच्या शुभेच्छा देत बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला. तसेच सरपंच नौशाद लतीफ मोमीन, उपसरपंच घनश्याम भुतडा, ग्राम विकास अधिकारी भागवत भुजबळ, कैलास आलझेंडे, बाळासाहेब बनकर आणि पत्रकार प्रकाश यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.सर्व मान्यवरांनी गावातील सामाजिक सलोखा, परस्पर प्रेम आणि एकतेची परंपरा कायम ठेवण्याचे आवाहन केले. सर्व समाजातील नागरिक एकत्र येऊन प्रत्येक सण उत्साहात साजरा करत असल्यामुळे पात्रुड गावाची ओळख आदर्श गाव म्हणून निर्माण होत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## जायकवाडी धरणातील हक्काच्या पाण्यासाठी बैलगाडी मोर्चात सहभागी व्हा - डॉ. गणेश ढवळे

बीड /प्रतिनिधी

जायकवाडी धरणातील मराठवाड्यासह बीड जिल्ह्याच्या हक्काच्या पाण्यासाठी लोकल आंदोलनाच्या वतीने शुक्रवार दि.२९ रोजी जिल्हा स्टेडियम ते जिल्हाधिकारी कार्यालय असा बैलगाडी मोर्चा काढण्यात येणार असून, या मोर्चात शेतकरी, शेतकरी पुत्र तसेच शेतकऱ्यांविषयी संवेदना असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केले आहे.



मराठवाड्याच्या हक्काचे कृष्णा खोऱ्यातील २५ टीएमसी पाणी देण्यास पश्चिम महाराष्ट्रातील नेते टाळाटाळ करत आहेत. मराठवाडा, विशेषतः बीड जिल्हा, सिंचनाच्या मोठ्या अनुशेषाला सामोरे जात आहे.कोकणातील १६८ टीएमसी अतिरिक्त पाणी नदीजोड प्रकल्पातून मराठवाड्याकडे वळविण्याचे नियोजन असून, हे काम नियोजित वेळेत पूर्ण करून बीड जिल्ह्यातील शेतीला पाणी मिळावे, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प तातडीने राबवून त्यासाठी सर्व्हे करण्यात यावा, यासोबतच कोकणातून येणाऱ्या १६८ टीएमसी पाण्यातून बीड जिल्ह्याला किती पाणी देता येईल, याचा स्वतंत्र सर्व्हे करावा. गेवराई तालुक्यातून जाणारा उजवा कालवा आणि माजलगाव धरणातून जायकवाडी धरणाला मिळणारे पाणी पूर्ववत करण्यात यावे, या सर्व मागण्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडी मोर्चात जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे.

## आष्टी शहरासह तालुक्यात बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी

हिंदू-मुस्लिम बांधवांच्या एकोप्याचा पुन्हा एकदा आदर्श

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी शहरासह तालुक्यातील विविध गावांमध्ये बकरी ईद मोठ्या उत्साह, आनंद आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. आष्टी शहराबरोबरच कडा, धामणगाव, आष्टा हरिनारायण, धानोरा, दौलावडगाव, लोणी आदी गावांमध्ये मुस्लिम बांधवांनी सकाळी विशेष नमाज अदा करून शांतता, बंधुभाव आणि सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. यानंतर एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देत सणाचा आनंद साजरा करण्यात आला.

बकरी ईदच्या निमित्ताने मुस्लिम समाजातील नागरिकांनी परंपरेनुसार धार्मिक विधी पार पाडले. मशिदींमध्ये विशेष नमाज पठण करण्यात आले. अनेक ठिकाणी धार्मिक उपदेश, सामाजिक सलोखा आणि परस्पर सहकार्याचा संदेश देण्यात आला. समाजातील ज्येष्ठ नागरिक, युवक आणि लहान मुलांनी नव्या उत्साहात सणामध्ये सहभाग घेतला.

विशेष म्हणजे, या सणानिमित्त हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या गळाभेटी घेत परस्पर शुभेच्छांची देवाणघेवाण केली. अनेक ठिकाणी हिंदू बांधवांनी मुस्लिम मित्रांच्या घरी भेट देऊन बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या, तर मुस्लिम समाजातील नागरिकांनीही आपुलकीने त्यांचे स्वागत केले. या माध्यमातून सामाजिक ऐक्य, प्रेम आणि एकोप्याचा सुंदर संदेश संपूर्ण तालुक्यात दिसून आला.

आष्टी तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून सर्व धर्मीय सण उत्साहात आणि एकोप्याने साजरे करण्याची परंपरा कायम आहे. दीपावली, दसरा, अखंड हरिनाम सप्ताह, यात्रा, रमजान ईद, बकरी ईद यांसारखे विविध धार्मिक सण सर्व समाजातील नागरिक एकत्र येऊन आनंदाने साजरे करतात. त्यामुळे तालुक्यात सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे वातावरण दृढ होत असल्याचे चित्र पाहायला मिळते.

माणुसकी हीच खरी जात आणि मानवता हाच धर्म या विचाराला अनुसरून येथील नागरिक परस्पर आदर, प्रेम आणि विश्वास जपत गुण्यागोविंदाने जीवन जगत आहेत. धार्मिक विविधतेतून सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा हा आदर्श आष्टी तालुक्याने पुन्हा एकदा कायम ठेवला असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. बकरी ईदच्या निमित्ताने गावागावांत आनंद, उत्साह आणि सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले होते. सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने हिंदू-मुस्लिम एकोप्याचा हा आदर्श इतरांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

## खा. डॉ. श्रीकांत शिंदे आज शिवसंवाद दौरा व विधानसभा आढावा बैठकी निमित्त बीड जिल्ह्यात

पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - उपजिल्हाप्रमुख गणेश उगले

बीड /प्रतिनिधी

सलग दोन वेळा भारताच्या संसदेमध्ये संसद रत्न म्हणून किताब मिळविणारे युवासेनेचे मुख्य नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे आज शुक्रवार दिनांक २९ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून बीड जिल्हा दौऱ्यावर आहेत. बीड जिल्ह्यातील नियोजित बैठकीला आणि कार्यक्रमांना पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना उपजिल्हाप्रमुख गणेश उगले पाटील यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यातील सहा विधान सभा मतदार संघाच्या आढावा बैठकीस व शिवसंवाद दौऱ्यास शिवसेना पक्षाचे जिल्हा संपर्क मंत्री व राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत शेठ गोगावले, मराठवाडा विभाग संपर्क मंत्री प्रकाश आबिटकर, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी,लोकसभा संपर्कप्रमुख मनोज शिंदे, मा. खा. आनंद परांजपे यांच्यासह वरिष्ठ मान्यवर व या बैठकासाठी जिल्ह्याचे जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख



चंद्रकांत नवले, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर, युवा सेना लोकसभा संपर्कप्रमुख बाजीराव चव्हाण हे उपस्थित राहणार आहेत. शिवसेना व शिवसेनेचे अंगीकृत सर्व संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तसेच नगरपरिषद जिल्हा परिषद पंचायत समिती मधील सदस्य लोकप्रतिनिधी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश उगले यांनी केले आहे.


हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानांतर्गत भाजपाचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

## गणेश शिंदे,माऊली जरांगे,सुरेश उगलमुगले,भागवत येवले यांचा सहभाग

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी बीड जिल्ह्याचे दोन दिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदर येथे असलेल्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या निसर्गरम्य परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. पक्ष संघटन अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरात भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेचा प्रसार, संघटनात्मक बळकटी, कार्यकर्त्यांशी संवादकौशल्य, प्रभावी जनसंपर्क, बूथ व्यवस्थापन, सामाजिक माध्यमांचा वापर, तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यकर्त्यांनी गावपातळीपासून बूथ स्तरापर्यंत सक्रिय राहून पक्ष धोरणे जनतेपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन मान्यवरांनी केले. आष्टी विधानसभा मतदारसंघाचे लोकनेते तथा मराठवाडा भूषण आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना भाजप आष्टी विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष गणेश नाना शिंदे, जिल्हा परिषद सदस्य माऊली आप्पा जरांगे, शिरूर कासार तालुकाध्यक्ष सुरेश उगलमुगले तसेच पाटोदा तालुकाध्यक्ष भागवत येवले यांनी




सक्रिय सहभाग नोंदविला.

दोन दिवस चाललेल्या या शिबिरामध्ये अनुभवी प्रशिक्षक आणि पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी विविध विषयांवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. पक्षाच्या वैचारिक अधिष्ठानाबरोबरच संघटन व्यवस्थापन, नेतृत्व कौशल्य, लोकांशी संवादाची प्रभावी पद्धत, निवडणूकपूर्व तयारी, कार्यकर्त्यांची जबाबदारी आणि बूथ स्तरावरील नियोजन याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यकर्त्यांनी केवळ पक्षीय भूमिका मांडण्यापेक्षा समाजातील प्रत्येक घटकांशी सातत्यपूर्ण संपर्क ठेवत जनतेच्या प्रश्नांमध्ये सहभागी होण्याची गरजही यावेळी अधोरेखित करण्यात आली. शिबिरात उपस्थित कार्यकर्त्यांनी पक्ष संघटनेला अधिक सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण शिबिर अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना व्यक्त केली. शिबिरामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व निवडणुकांच्या अनुषंगाने नव्या जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाल्याचे अनेकांनी सांगितले.

राजकीय, सामाजिक आणि संघटनात्मक क्षेत्रात कार्यकर्त्यांचे कौशल्य वृद्धिंगत व्हावे, पक्षाच्या विचारधारेबाबत स्पष्टता निर्माण व्हावी आणि गावपातळीवर मजबूत संघटन उभी राहावी या उद्देशाने अशा प्रकारचे प्रशिक्षण उपक्रम महत्त्वाचे ठरत असल्याचे मत उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आले. या दोन दिवसीय शिबिरामुळे भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांमध्ये संघटनात्मक शिस्त, समन्वय आणि आगामी जबाबदाऱ्यांबाबत अधिक सजगता निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

# ११ वर्षानंतर देऊळ बंद २ ची बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर एन्ट्री;प्रदर्शित होताच महाराष्ट्र झाला स्वामीमय

## पहिल्या ६ दिवसांत २४.६ कोटींची विक्रमी कमाई ;थिएटरबाहेर तुफान गर्दी,सर्वत्र शो हाऊसफुल्ल

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) सन २०१३ साली श्रद्धा विरुद्ध विज्ञान असा अनोखा संगम मांडत मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या देऊळ बंद चित्रपटाची जादू ११ वर्षांनंतरही कायम असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. बहुप्रतिक्षित देऊळ बंद २ या सिक्केलने प्रदर्शित होताच मराठी चित्रपटसृष्टीत ब्लॉकबस्टर एन्ट्री केली असून, राज्यभरातील प्रेक्षकांचा या चित्रपटाला तुफान प्रतिसाद मिळत आहे. मराठी चित्रपटसृष्टीत एक नवा पायंडा पाडत या चित्रपटाचे प्रदर्शन पारंपारिक शुक्रवार ऐवजी गुरुवारी दि.२१ मे रोजी करण्यात आले. गुरुपुष्यामृत योग आणि ब्रह्ममुहूर्ताचे औचित्य साधून सकाळी ६ वाजता हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. विशेष म्हणजे, या पहाटेच्या शोसाठीही प्रेक्षकांनी थिएटरबाहेर अक्षरशः रांगा लावल्याचे अभूतपूर्व चित्र संपूर्ण महाराष्ट्रात पाहायला मिळाले.

देऊळ बंद २ ने पहिल्याच दिवशी ३.०५ कोटी रुपयांची धमाकेदार कमाई करून बॉक्स ऑफिसवर नवा विक्रम रचला. ही घोडदौड इथेच न थांबता, मंगळवार पर्यंतच्या अवघ्या ६ दिवसांत चित्रपटाने तब्बल २४.६ कोटी रुपयांपेक्षा जास्त गल्ला



जमवला आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि मुंबई, नाशिक आणि जळगाव संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या सर्वच भागांमध्ये चित्रपटाची प्रचंड क्रेझ पाहायला मिळत असून, बहुतांश चित्रपट गृहांमध्ये तिकीट खिडक्यांवर हाऊसफुल्लचे बोर्ड झळकत आहेत.

सोशल मीडियावर देऊळ बंद २ ची जोरदार चर्चा रंगली आहे. चित्रपटातील दमदार संवाद, भक्कम कथानक, डोळ्यांच्या कडा ओलावणारे भावनिक प्रसंग आणि अंगावर काटा आणणारे संगीत प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी, प्रवीण तरडे आणि स्नेहल तरडे यांच्या कसदार अभिनयाचे प्रेक्षक भरभरून कौतुक करत आहेत. या दिग्गजांसोबतच अहिल्यानगरचे सुपुत्र स्वप्नील मुनोत, पवन पोटे आणि गगन शिंदे यांनी चित्रपटात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या असून त्यांच्या अभिनयाचीही स्थानिक पातळीवर व राज्यभरात विशेष दखल घेतली जात आहे.

वटवृक्ष इंटरटेनमेंट च्या बॅनरखाली या भव्य चित्रपटाची निर्मिती कैलास वाणी, सौ. जयश्री वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी-सूर्यवंशी यांनी केली आहे. चित्रपटाचे उत्कृष्ट छायांकन, प्रभावी पार्श्वसंगीत आणि भव्य सादरीकरण यामुळे पडद्यावरची दृश्ये अधिकच उठावदार झाली आहेत. प्रदर्शित होताच मिळालेल्या या अभूतपूर्व प्रतिसादामुळे आणि प्रेक्षकांच्या उदंड प्रेमामुळे देऊळ बंद २ हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीतील यंदाच्या वर्षातला सर्वाधिक चर्चेत असलेला आणि सर्वात मोठा ब्लॉकबस्टर चित्रपट ठरला आहे.

# आज अपर मुख्य सचिव महसूल विकास खारगे यांचा जालना-अंबड दौरा

जालना शेख फारुक :-

राज्याचे अपर मुख्य सचिव महसूल विकास खारगे हे शुक्रवार दि.२९ मे २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून विविध शासकीय कार्यालये विकासकामे व प्रकल्पांची पाहणी करणार आहेत.त्यांच्या दौऱ्यामुळे जिल्हा प्रशासनात हालचालींना वेग आला असून संबंधित विभाग सज्ज झाले आहेत.

दौऱ्याची सुरुवात सकाळी ८.०० वाजता दरेगाव ता. जालना येथील ड्रायपोर्ट प्रकल्पाच्या पाहणीने होणार आहे. त्यानंतर सकाळी ९.०० वाजता मोतीबाग चौपाटी येथील सुशोभीकरण कामांची पाहणी करण्यात येणार आहे. सकाळी ९.१५ वाजता जिल्हा रेशीम कोष बाजारपेठ सिरसवाडी रोड जालना येथे भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला जाणार आहे.

सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत शासकीय विश्रामगृह, जालना येथे वेळ राखीव ठेवण्यात आली आहे. त्यानंतर सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे विविध विभागांची आढावा बैठक व पाहणी होणार आहे.

दुपारी १२.३० वाजता प्रशासकीय इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयास



भेट देण्यात येणार असून दुपारी १.१५ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना येथे पाहणी केली जाणार आहे.

यानंतर दुपारी २.०० वाजता कृषी पर्यटन केंद्र लालवाडी ता. अंबड येथे आगमन व भोजनाचा कार्यक्रम आहे. दुपारी ३.०० वाजता तहसील कार्यालय अंबड तसेच आधार केंद्र व महा-ई-सेवा केंद्राची पाहणी केली जाणार आहे. दुपारी ३.४५ वाजता सह दुय्यम निबंधक कार्यालय अंबड येथे भेट देण्यात येणार असून सायंकाळी ४.३० वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय अंबड येथे पाहणी होणार आहे.

सायंकाळी ५.३० वाजता मंठा चौफुली येथील प्रियीयम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथे सुरू असलेल्या सुपर फिफ्टी उपक्रमाला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला जाणार आहे. त्यानंतर विकास खारगे हे सोईनुसार छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करणार आहेत.

## प्रा.डॉ.श्याम सांगळे यांच्या सेवापूर्ती निमित्त भव्य गौरव समारंभाचे आयोजन

# ज्ञानसाधनेचा प्रदीर्घ प्रवास पूर्णत्वाकडे; चक्रवर्ती श्याम गौरव ग्रंथाचे होणार प्रकाशन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाचे ज्येष्ठ, अभ्यासू, कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थ्यांमध्ये विशेष लोकप्रिय असलेले ग्रंथपाल प्रा. डॉ. श्याम सांगळे यांच्या प्रदीर्घ, समर्पित आणि उल्लेखनीय शैक्षणिक सेवेला आता विराम मिळत असून त्यांच्या ज्ञानसेवा, सामाजिक बांधिलकी आणि ग्रंथालय क्षेत्रातील मोलाच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी शनिवार, दि. ३० मे रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालय परिसरात भव्य सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष सोहळ्यानिमित्त धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची भरगच्च आखणी करण्यात आली असून परिसरात या कार्यक्रमाबाबत उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रा. डॉ. श्याम सांगळे यांनी आपल्या कार्यकाळात केवळ ग्रंथपाल म्हणून जबाबदारी पार पाडली नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजविणे, ज्ञानार्जनाची प्रेरणा देणे, संशोधनवृत्ती विकसित करणे आणि शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध करण्यासाठी सातत्याने परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी, अभ्यासासाठी आवश्यक मार्गदर्शन, संदर्भग्रंथांची उपलब्धता आणि वाचनालयाचा प्रभावी वापर यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत आजही विद्यार्थी आणि शिक्षकवर्गात आदराने स्मरणात आहे. त्यांच्या संयमी, अभ्यासू आणि मनमिळावू व्यक्तिमत्त्वामुळे त्यांनी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी तसेच वाचकवर्गाशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले आहे.



या सेवापूर्ती गौरव सोहळ्याची सुरुवात समाजप्रबोधनपर आणि आध्यात्मिक विचारांनी परिपूर्ण हरिकीर्तनाने होणार आहे. महाराष्ट्र शासनाचा मानाचा राष्ट्रीय कीर्तनकार पुरस्कार प्राप्त तसेच शिवनेर भूषण सन्मानाने गौरविण्यात आलेले आळंदी येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांचे सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जाहीर हरिकीर्तन पार पडणार आहे. त्यांच्या प्रभावी वाणीमधून अध्यात्म, संस्कार, समाजजागृती आणि जीवनमूल्यांचा संदेश परिसरातील नागरिकांना अनुभवता येणार असून, हा कार्यक्रम उपस्थितांसाठी एक प्रकारची वैचारिक आणि आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे.

हरिकीर्तनानंतर प्रा. डॉ. श्याम सांगळे यांच्या जीवनप्रवासावर, शैक्षणिक कार्यावर, ग्रंथालय क्षेत्रातील योगदानावर, सामाजिक जडणघडणीत निभावलेल्या भूमिकेवर आणि विद्यार्थ्यांच्या जीवनात घडविलेल्या सकारात्मक बदलांवर प्रकाश टाकणाऱ्या चक्रवर्ती श्याम या विशेष गौरव ग्रंथाचे थाटामाटात प्रकाशन करण्यात येणार आहे. हा गौरव ग्रंथ प्रा. डॉ. सांगळे यांच्या कार्याचा लेखाजोखा मांडणारा तसेच त्यांच्या ज्ञानसाधनेचा प्रेरणादायी दस्तऐवज ठरणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

या विशेष ग्रंथाचे प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार आदरणीय श्री. भीमराव धोंडे यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय शैक्षणिक, सामाजिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षक, माजी विद्यार्थी, हितचिंतक आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रा. डॉ. श्याम सांगळे हे आपल्या शांत, संयमी, अभ्यासू आणि विद्यार्थ्याभिमुख स्वभावामुळे पंचक्रोशीत विशेष परिचित आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांकडे आपुलकीने पाहणे, ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे दालन न ठेवता ज्ञानसंवादाचे केंद्र बनविण्याचा प्रयत्न करणे आणि वाचन संस्कृतीची चळवळ जिवंत ठेवण्यासाठी सातत्याने योगदान देणे, ही त्यांची ओळख राहिली आहे. त्यामुळे त्यांच्या सेवापूर्तीचा हा सोहळा केवळ निवृत्तीचा कार्यक्रम नसून त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा आणि प्रेरणादायी जीवनप्रवासाचा गौरव करणारा ऐतिहासिक क्षण ठरणार असल्याचे बोलले जात आहे. या भव्य सेवापूर्ती गौरव सोहळ्यासह समाजप्रबोधनपर कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, माजी विद्यार्थी, वाचकवर्ग आणि हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सत्कारमूर्ती प्रा. डॉ. श्याम सांगळे यांनी केले आहे.

# जो विद्यार्थी सर्वांगीण घडवतो तोच खरा शिक्षक-ह.भ.प.काशिनाथ महाराज शास्त्री

## आष्टी तालुक्यासारखी शिक्षकांची एकजूट क्वचितच पाहायला मिळते-विजय गोल्हार

श्री.चांगदेव तरटे यांनी शिक्षण क्षेत्रात अत्यंत प्रामाणिक सेवा केली-उद्धव दरेकर

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी (पाटण), केंद्र डोईठाण येथील कर्तव्यदक्ष, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत राहिलेले आदर्श मुख्याध्यापक श्री. चांगदेव पांडुरंग तरटे हे वयोमानानुसार दि. ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत असून, त्यांच्या प्रदीर्घ, उल्लेखनीय व प्रेरणादायी शैक्षणिक सेवेला गौरविण्यासाठी सेवापूर्ती गौरव समारंभाचे भव्य आयोजन गुरुवार दि. २८ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता सांगवी (पाटण) येथील स्वराली लॉन्स, नगर-बीड रोड येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या सोहळ्याला राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, पत्रकारिता व विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. या सेवापूर्ती गौरव समारंभाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. काशिनाथ महाराज शास्त्री (सुदर्शनगड, सांगवी पाटण) हे होते.

प्रमुख पाहुणे म्हणून विजय गोल्हार, उद्धव बापू दरेकर, मनोरंजन धस, दत्तात्रय खोटे, शत्रुघ्न मरकड, ज्ञानेश्वर भोसले, वशिष्ठ महाराज तरटे, लक्ष्मण ननवरे, अशोक गर्जे, सुरेश पवार, श्रीमती सुनिता उगले मॅडम, श्रीमती आम्रपाली सावंत मॅडम, श्रीमती संगीता होळकर मॅडम, मारुती पठाडे, महेशकुमार शिंदे, आजिनाथ गर्जे, बाबासाहेब झिंजुर्के, दादासाहेब बोराडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब पोटे यांनी केले. यावेळी त्यांनी श्री. चांगदेव तरटे यांच्या प्रदीर्घ सेवाकाळाचा आढावा घेत त्यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय व सामाजिक योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

यानंतर सेवापूर्ती निमित्त सत्कारमूर्ती श्री. चांगदेव पांडुरंग तरटे व त्यांच्या सहचारिणी श्रीमती शोभा तरटे या दांपत्याचा अध्यक्ष व




प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार, फेटा परिधान करून तसेच उभा पोशाख देऊन डोईठाण केंद्राच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, पाटण-सांगवी ग्रामस्थ तसेच डॉ. युवराज तरटे यांच्या वतीनेही विशेष गौरव करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या दांपत्याचा सन्मान करून त्यांच्या कार्याला मानवंदना दिली.

याप्रसंगी बोलताना मनोरंजन धस यांनी श्री. तरटे यांनी आजपर्यंतची शैक्षणिक सेवा अत्यंत निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने पार पाडल्याचे सांगितले. त्यांच्या कार्यकाळात प्रशासकीय कामकाजात सहकार्य करण्याची संधी मिळाल्याचे सांगून निवृत्तीनंतर त्यांनी सामाजिक कार्यात अधिक योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उद्धव बापू दरेकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, चांगदेव तरटे यांनी शिक्षण क्षेत्रात अत्यंत प्रामाणिक सेवा केली असून आष्टी तालुक्यातील शिक्षकवर्ग गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सातत्याने कार्यरत आहे. निवृत्तीनंतरही त्यांनी तरुण शिक्षकांना मार्गदर्शन करून अनुभवाची शिदोरी पुढील पिढीपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले.

विजय गोल्हार यांनी तरटे सर हे आपले बालपणीचे जिवलग मित्र असल्याचे सांगत त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची बीजे रोवली असल्याने त्यांच्या कुटुंबातील मुलेही उच्चशिक्षित बनल्याचा उल्लेख केला. शिक्षकांना मार्गदर्शन करताना त्यांनी शिक्षकांनी व्यसनमुक्त राहून चांगले विद्यार्थी घडवावेत, समाजासाठी आदर्श निर्माण करावा, असे आवाहन केले. बीड जिल्ह्यात आष्टी तालुक्यासारखी शिक्षकांची एकजूट क्वचितच पाहायला मिळते, असेही त्यांनी नमूद केले. तसेच ऑनलाइन बदली धोरणामुळे शिक्षकांच्या बदल्या पारदर्शक होत असल्याचे सांगून त्यांनी या धोरणाचे समर्थन केले. समारोपाच्या अध्यक्षीय भाषणात ह.भ.प. काशिनाथ महाराज शास्त्री यांनी जो विद्यार्थी सर्वांगीण घडवतो तोच खरा शिक्षक असे सांगत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. मराठी शाळांचे अस्तित्व टिकून राहणे ही काळाची गरज असून मराठी माणसांनी आपल्या भाषेच्या आणि शिक्षण व्यवस्थेच्या जतनासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. शेवटी त्यांनी श्री. चांगदेव तरटे यांना शुभाशीर्वाद देत निरोगी, आनंदी व समाजोपयोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विजय मरकड, वशिष्ठ महाराज तरटे, प्रा. गिर्हे सर, किरण तरटे, मारुती पठाडे यांनी मनोगत व्यक्त करून तरटे सरांच्या कार्याचा गौरव केला व भावी आयुष्यास शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना श्री. चांगदेव पांडुरंग तरटे यांनी आपल्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत, आजवरच्या वाटचालीत सहकार्य करणारे सहकारी शिक्षक, अधिकारी, ग्रामस्थ, विद्यार्थी, पालक, मित्रपरिवार व कुटुंबीय यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षक म्हणून मिळालेला सन्मान आणि विद्यार्थ्यांचे प्रेम हीच माझी खरी कमाई आहे, अशा भावनिक शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमास नवनाथ खंडागळे, आकाश तरटे, ज्योतिबा महाडिक यांच्यासह पत्रकार नितीन कांबळे, दादा पवळ, शेख समीर, संतोष दाणी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन आदर्श शिक्षक अशोक उढाणे व एम.आर. देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रवीण मेहेरकर यांनी केले.

सदर सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन केंद्र डोईठाणच्या वतीने करण्यात आले होते. यासाठी केंद्रातील सर्व घटक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, ग्रामस्थ, आजी-माजी विद्यार्थी आणि हितचिंतक यांनी विशेष पुढाकार घेतला होता. या सोहळ्यास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी, पालक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. शेवटी सर्वांसाठी आयोजित सुरुची भोजनाने कार्यक्रमाचा समारोप झाला.


# ७० दिवसांच्या उपोषणानंतरही प्रशासन ढिम्म

## ९९ लाखांच्या भ्रष्टाचार प्रकरणात कार्यकारी अभियंत्यांची भ्रष्टाचार्यांना अभय भूमिका ?

अधीक्षक अभियंत्यांच्या आदेशालाच केराची टोपली विजय यादव लोणीकर संतप्त

जालना शेख फारुक :-

परतूर सार्वजनिक बांधकाम उपविभागातील तब्बल ९९ लाख रुपयांच्या कथित भ्रष्टाचार प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले असून ७० दिवसांपासून उपोषण करणारे विजय यादव लोणीकर यांनी प्रशासनाच्या मुजोर आणि संशयास्पद भूमिकेविरोधात संताप व्यक्त केला आहे. भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपांवर कारवाईचे स्पष्ट आदेश देऊनही जालना सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ चे कार्यकारी अभियंता मात्र अद्याप धिम्म असल्याने आता या अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.



छत्रपती संभाजीनगर येथील अधीक्षक अभियंत्यांनी महिनाभरापूर्वीच संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याचे लेखी आदेश दिले होते. मात्र आदेशानंतरही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने फाईल दाबून भ्रष्टाचार्यांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे का ? असा संतप्त सवाल विजय यादव लोणीकर यांनी उपस्थित केला आहे.

वरिष्ठांच्या आदेशालाच उघड अवहेलना ?

प्रशासनात वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश अंतिम मानले जातात. मात्र जालना येथील कार्यकारी अभियंता यांनी अधीक्षक अभियंत्यांच्या आदेशालाच जणू काही कचऱ्याची टोपली दाखवली असल्याची चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे वरिष्ठांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करण्याची ही दुसरी वेळ असल्याने हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून थेट प्रशासकीय बंडखोरी असल्याची भावना जनतेत व्यक्त होत आहे.

परतूर उपविभागातील रस्ते कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता निकृष्ट दर्जाची कामे आणि आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत होत्या. त्यानंतर अधीक्षक अभियंत्यांनी स्वतः दखल घेत कारवाईचे आदेश दिले. पण महिनाभर उलटल्यानंतरही दोषींवर कारवाईचा साधा फटका सुद्धा बसलेला नाही.

९९ लाखांचा प्रश्न जनतेच्या पैशावर डल्ला ?

हा पैसा कोणाच्या बापाचा नसून जनतेच्या घामाचा आहे. भ्रष्टाचार करणारे जितके दोषी तितकेच त्यांना पाठीशी घालणारे अधिकारीही दोषी आहेत अशी आक्रमक भूमिका विजय यादव लोणीकर यांनी घेतली आहे.

कार्यकारी अभियंत्यांच्या या संशयास्पद मौनामुळे आता अधीक्षक अभियंता स्वतः या प्रकरणात ॲक्शन मोड मध्ये येणार का ? की पुन्हा एकदा कागदी घोडेच नाचवले जाणार ? असा सवाल उपस्थित होत आहे.

आंदोलनाचा इशारा प्रशासनाविरोधात संतापाची लाट

७० दिवस उपोषण करूनही प्रशासनाला जाग येत नसेल तर हे सरकार आणि अधिकारी नेमके कोणासाठी काम करत आहेत ? असा थेट सवाल आता जनतेतून विचारला जात आहे. दोषींवर आणि त्यांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई झाली नाही तर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल असा इशाराही विजय यादव लोणीकर यांनी दिला आहे.

दरम्यान या संपूर्ण प्रकरणामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून परतूरसह संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे.

# अंबड तालुक्यातील जामखेड व शिरनेर वर्ग-२ सिलिंग जमिनींचा मोठा महसुली खेळ खेळखंडोबा तत्कालीन तहसीलदार चंद्रकांत शेळके संशयाच्या भोवऱ्यात

## नियम धाब्यावर बसवून वर्ग-२ ची सिलिंग जमीन थेट वर्ग-१ मध्ये रूपांतरित

अंबड विशेष प्रतिनिधी शेख फारुक :-

तालुक्यात महसूल विभागाच्या छुप्या आशीर्वादाने आणि संगनमताने झाला असलेला कथित वर्ग-२ सिलिंग जमिनींचा महाघोटाळा आता चव्हाट्यावर आला आहे. तत्कालीन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या कार्यकाळातील अनेक संशयास्पद आणि नियमबाह्य निर्णयांनी महसूल वर्तुळात प्रचंड खळबळ उडवून दिली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कडक कायदेशीर तरतुदींना पूर्णपणे हरताळ फासून कोणताही कायदेशीर आधार नसताना आणि शासनाचा हक्काचा करोडो रुपयांचा नजराणा महसूल न भरता वर्ग-२ च्या मौल्यवान जमिनी थेट वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्याचा काळा खेळ खेळला गेल्याचा खळबळजनक आरोप होत आहे. या महाभागांमुळे आता थेट तत्कालीन तहसीलदार, त्यांचे सहकारी तलाठी, एक सेवानिवृत्त मंडळ अधिकारी आणि सध्या कार्यरत असलेल्या मंडळ अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाईची टांगती तलवार निर्माण झाली आहे.

कायदेशीर नियम पायदळी सरकारी तिजोरीला कोट्यवधींचा चुना

प्राप्त झालेल्या धक्कादायक कागदपत्रांनुसार मौजे जामखेड येथील गट नं. ३४ मधील सामाईक क्षेत्र १ हेक्टर ६४ आर हे मूळत शासकीय अटी-शर्तींच्या अधीन असलेले भोगवटदार वर्ग-२ स्वरूपाचे होते. सिलिंग कायद्यांतर्गत किंवा शासकीय वाटपातील अशा जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी आणि कडक कायदेशीर प्रक्रियेचे पालन करणे अनिवार्य असते.

चलन गायब फेरफार मंजूर

अत्यंत गंभीर बाब म्हणजे शासनाचा महसूल भरल्याचे कोणतेही कायदेशीर चलन किंवा पावती फेरफारला न जोडताच हा फेरफार मंजूर करण्यात आला. तत्कालीन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आपल्या पदाचा आणि अधिकाराचा गैरवापर करत संबंधित मंडळ अधिकाऱ्यांना हाताशी धरून कोणतीही वैध परवानगी नसताना हे क्षेत्र बेकायदेशीरपणे थेट वर्ग-१ केले. याच बेकायदेशीर फेरफाराचा गैरफायदा पुढे टिपी सौर्या लिमिटेड या खाजगी कंपनीला दीर्घ मुदतीच्या भाडेकरारासाठी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात आल्याचे उघड झाले आहे.



या संपूर्ण गैरव्यवहारात बबन निवृत्ती सपाटे आणि प्रकाश निवृत्ती सपाटे यांच्या नावावरील सामाईक क्षेत्राच्या ७/१२ वरून बेकायदेशीरपणे वर्ग-२ चे पुनर्विलोकन न करता ते नियमबाह्य रीतीने वगळण्यात आले. महसूल अधिकाऱ्यांच्या थेट संगनमताने शासकीय अभिलेखात आणि कागदपत्रांत मोठी फेरफार व खाडाखोड झाल्याचे स्पष्ट होत आहे.

शिरनेरमध्येही तोच पॅटर्न पुराव्यांची विल्हेवाट लावण्यासाठी मौल्यवान फाईली गायब

या कथित घोटाळ्याची पाळेमूळ केवळ जामखेडपुरती मर्यादित नसून ती संपूर्ण तालुक्यात दूरवर पसरलेली आहेत. मौजे शिरनेर येथील गट न. २०२ मधील तब्बल २ हेक्टर ११ आर जमीनही मूळ भोगवटदार वर्ग-२ सिलिंग स्वरूपाची होती. मात्र तिथेही महसूल नियमांना बासनात गुंडाळून वर्ग-१ रूपांतरणाचा तोच जामखेड पॅटर्न राबवण्यात आला.

याहूनही अधिक धक्कादायक आणि फौजदारी स्वरूपाची बाब म्हणजे अंबड तालुक्यातील पारनेर,गोंदी,जामखेड आणि शिरनेर परिसरातील अनेक वर्ग-२ सिलिंग जमिनींच्या शासकीय फाईली आणि मूळ दस्तावेज तहसील कार्यालयातून गूढरीत्या गायब असल्याची खात्रीलायक माहिती आहे. आपल्या बेकायदेशीर कृत्यांचे पुरावे नष्ट करण्यासाठी आणि चौकशीतून वाचण्यासाठी हा गंभीर प्रकार केला गेला आहे का ? असा संशय आता बळावला असून हा थेट भारतीय न्याय संहिता बीएनएस अंतर्गत पुरावे नष्ट करण्याचा गंभीर फौजदारी गुन्हा ठरतो.

भू-माफिया बड्या कंपन्या आणि अधिकाऱ्यांचे संघटित रॅकेट

काही भ्रष्ट महसूल कर्मचाऱ्यांनी आणि अधिकाऱ्यांनी शासकीय अधिकारांचा गैरवापर करून नियमबाह्य आदेशांच्या आधारे कोट्यवधी रुपयांच्या मौल्यवान शासकीय व सिलिंगच्या जमिनी खाजगी कंपन्या आणि भू-माफियांना आंदण म्हणून दिल्याचा आरोप स्थानिक नागरिकांमधून होत आहे. शासनाचा हक्काचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवून स्वतःचे खिसे भरणारे हे जालना जिल्ह्यातील आजवरचे सर्वात मोठे संघटित जमीन रॅकेट असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.जनतेचे धारदार प्रश्न; उच्चस्तरीय चौकशी आणि थेट फौजदारीची मागणीया जमीन घोटाळ्यामुळे आता संपूर्ण जालना जिल्ह्याचे लक्ष अंबडकडे वेधले गेले असून जनतेतून आणि सामाजिक कार्यकर्त्यांमधून थेट व धारदार प्रश्न उपस्थित केले जात आहेत

अंबड तालुक्यातील वर्ग-२ सिलिंग जमिनींचा नेमका घोटाळा किती कोटींचा आहे ?

महसूल कार्यालयातून शासकीय फाईली गायब करणारे ते अदृश्य हात नेमके कोणाचे ?

नियमबाह्य आदेश देऊन शासकीय तिजोरी लुटणारे आणि खाजगी कंपन्यांचे खिसे भरणारे अधिकारी अद्याप मोकाट का ?

तात्काळ कारवाईची मागणी

या गंभीर प्रकरणाची जिल्हाधिकारी कार्यालय आणि महसूल आयुक्तांनी तात्काळ दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशी समिती नेमावी; तसेच तत्कालीन तहसीलदार चंद्रकांत शेळके, संबंधित मंडळ अधिकारी, भू-माफिया आणि बनावट फेरफारचा गैरफायदा घेणाऱ्या कंपन्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करून संबंधितांना निलंबित करावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.जर या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी झाली तर महसूल विभागातील अनेक पांढरपेशा बड्या अधिकाऱ्यांचे बुरखे फाटणार आणि अनेक मोठे मासे गळाला लागणार हे मात्र निश्चित

---

# पोलिसांची मनमानी न्यायालयाच्या चापकाने ठेचली नोटीस देऊन वेळेपूर्वीच अटक केल्याने जाफराबाद पोलिसांना कोर्टाचा दणका

### अरनेश कुमार खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचा उडवला फटका जालना पोलीस अधीक्षकांकडे कारवाईचा इशारा

जाफराबाद विशेष प्रतिनिधी इसरारखान पठाण :- कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षकच जेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांना केराची टोपली दाखवून मनमानी कारभार करतात तेव्हा न्यायालय त्यांना त्यांची जागा दाखवून देते याचाच प्रत्यय जाफराबाद न्यायालयात आला जाफराबाद पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या गुन्हा क्र. ५६/२०२६ प्रकरणात प्रभारी न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग मयुरेश काळे यांनी पोलिसांच्या बेकायदेशीर अटकेवर अत्यंत गंभीर आणि तीव्र शब्दांत ताशेरे ओढले आहेत. आरोपी प्रविण सुभाष पिंपळे यांची अटक पूर्णपणे बेकायदेशीर आणि अन्यायकारक असल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने जाफराबाद पोलिसांना उघडे पाडले आहे.

न्यायालयाचा जळजळीत सवाल नोटीस दिली मग वेळेपूर्वीच अटक का ?

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, तपास अधिकाऱ्यांनी आरोपी प्रविण पिंपळे यांना बी.एन.एस.एस. कलम ३५(३) अन्वये २० मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता तपासासाठी हजर राहण्याची लेखी नोटीस बजावली होती. मात्र कायदा धाब्यावर बसवत पोलिसांनी त्या वेळेच्या आधीच म्हणजेच २० मे रोजी मध्यरात्री १२:२४ वाजता आरोपीला घरातून उचलले आणि अटक केली.यावर संताप व्यक्त करत न्यायालयाने पोलिसांना थेट जाब विचारला जेव्हा स्वत तपास अधिकाऱ्यांनी आरोपीला तपासासाठी हजर राहण्याची ठराविक वेळ दिली होती तर मग त्या वेळेपूर्वीच मध्यरात्री अटक करण्याची एवढी घाई का नडली ? या एकाच प्रश्नाने जाफराबाद पोलिसांची चांगलीच भंबेरी उडाली.

पोलिसांचे खोटे दावे न्यायालयाने एका झटक्यात उधळले

न्यायालयासमोर स्वतःचा बचाव करण्यासाठी तपास अधिकाऱ्यांनी अनेक थिल्लर दावे केले जे न्यायालयाने केस डायरी आणि पुराव्यांच्या आधारे एका झटक्यात खोडून काढले

दावा १आरोपी फरार होण्याची शक्यता होती.

न्यायालयाचा चपराक: गुन्हा सप्टेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान घडल्याचे पोलीस म्हणतात. मग एवढे महिने पोलीस काय झोपा काढत होते ? या काळात आरोपीकडून माहिती मिळवण्यासाठी काय प्रयत्न केले याचा कोणताही उल्लेख ना रिमांड रिपोर्टमध्ये आहे ना केस डायरीमध्ये

दावा २ आरोपी नोटीस स्वीकारण्यास टाळाटाळ करत होता.

न्यायालयाचा चपराक पोलिसांनी सादर केलेल्या नोटीसवर आरोपीची स्पष्ट स्वाक्षरी आणि पोच आहे. त्यामुळे पोलिसांचा हा दावा धादांत खोटा आणि आधारहीन आहे.

दावा ३ तहसील कार्यालयाचे बनावट शिक्के वापरले.

न्यायालयाचा चपराक स्वत तहसीलदारांनी दिलेल्या पत्रात बनावट शिक्क्यांबाबत असा कोणताही स्पष्ट उल्लेख केलेला नाही.

अरनेश कुमार खटल्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचा खून

सर्वोच्च न्यायालयाने अरनेश कुमार विरुद्ध बिहार राज्य या ऐतिहासिक खटल्यात ७ वर्षांपेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्ह्यांमध्ये थेट अटक न करण्याबाबत कडक निर्देश दिले आहेत. या प्रकरणात सर्व कलमे ७ वर्षांपर्यंतच्या शिक्षेची असतानाही जाफराबाद पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशाचा क्रूर संकोच केला. आरोपीतर्फे ॲड. एम. एस. राऊत, विष्णू शिंदे आणि प्रदिप पटेल यांनी न्यायालयासमोर जोरदार युक्तिवाद करून पोलिसांची ही 'दडपशाही' चव्हाट्यावर आणली.

आरोपीची जामिनावर मुक्तता; पोलिसांवर कारवाईची टांगती तलवार

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने पोलिसांचा दोन दिवसांच्या कोठडीचा मागितलेला रिमांड फेटाळून लावला आणि आरोपी प्रविण पिंपळे यांची १५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर तात्काळ मुक्तता केली.

एवढ्यावरच न्यायालय थांबले नाही तर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल तपास अधिकाऱ्यांना ३ दिवसांच्या आत लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश दिले आहेत. जर पोलिसांनी समाधानकारक उत्तर दिले नाही तर थेट पोलीस अधीक्षक, जालना यांच्याकडे संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कडक विभागीय व कायदेशीर कारवाई करण्यासाठी हे प्रकरण पाठवले जाईल असा कडक इशारा न्यायालयाने दिला आहे. न्यायालयाच्या या सिंघम पवित्र्यामुळे जाफराबाद पोलीस वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

---



# दावरवाडी येथील बाळूमामा यांच्या पालखीची सांगता व गावात मिरवणूक...!

दावरवाडी प्रतिनिधी/ दावरवाडी येथील सात दीवसा पासुन आलेल्या बाळु मामा यांच्या पालखीची सांगता झाली रोज आरती झाल्यावर भोजनाची व्यवस्था येथे केली जात होती दोन हजार भाविक रोज भोजन करून जात असत गावातील फक्त रोज चार ते पाच वर्गणी करून पंगतीचे नियोजन करत होते कधी वरण पोळी आमरस पोळी बुधवारी एकादशी पर्वावर दोन क्विंटलची भाविक भक्तांसाठी शाबुदाणा खिचडी बनवण्यात आली होती बाळूमामाचा गुरुवार आज शेवटचा दिवस दावरवाडीतून असल्यामुळे हा त्यांच्या पालखीची सांगता व गावातील मिरवणूक काढण्यात आली गावात आपल्या घरासमोरील रांगोळी फुलं व घोंगडी आथरवण्यात येत होती ह्या मिरवणुकीत हजारो महिला तीन किलोमीटर पायी चालत मिरवणूक मोठ्या आनंदाने उत्सवात अनेक महिलाने बाळूमामाच्या नावानं चांगभलं या घोषणाने भंडारा उधळत फुगडी खेळत तीन किलोमीटर पर्यंत पालखीला निरोप देण्यात आला

---

# नांदेड विधानपरिषद निवडणूक : माधव पर्व सुरु होणार का ?

### अशोकरावांच्या छत्रछायेखाली ३५४ पैकी २०८ नगरसेवकांची जुळवाजुळव चर्चेत

#### पक्षप्रवेशाच्या गोप्यस्फोट होणार का?

तामसा (प्रतिनिधी)

नांदेड जिल्ह्यातील आगामी विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नावाची पुन्हा एकदा जोरदार चर्चा सुरू झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नगरसेवकांच्या संभाव्य पाठिंब्यामुळे माधव पर्व पुन्हा सुरू होणार का, अशी चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

राजकीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील एकूण ३५४ संभाव्य नगरसेवकांपैकी तब्बल २०८ नगरसेवकांची जुळवाजुळव अशोकरावांच्या छत्रछायेखाली होत असल्याची जोरदार चर्चा आहे. या संभाव्य गणितामुळे विधानपरिषद निवडणुकीतील समीकरणे वेगाने बदलताना दिसत आहेत.

सध्या उपलब्ध असलेल्या पक्षीय संख्याबळानुसार भाजपकडे ७७, काँग्रेसकडे ७५,राष्ट्रवादी (अप )७१,शिवसेना (ठा.)१७शिंदे गटाकडे १५, मराठवाडा जनहित पार्टीकडे ३३, एमआयएमकडे ५ वंचित बहुजन आघाडी १ तर अपक्ष नगरसेवकांची संख्या १३ असल्याचे सांगितले जात आहे. या सर्वांमधील अनेक नगरसेवकांनी जर माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नावावर एकमत दर्शविले, तर विधानपरिषद रणांगणात त्यांची दमदार एन्ट्री निश्चित मानली जात आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, जवळगावकर यांचे केवळ काँग्रेसपुरते मर्यादित राजकारण नसून विविध पक्षांतील कार्यकर्ते, नगरसेवक आणि स्थानिक नेत्यांशी त्यांचे मजबूत वैयक्तिक संबंध आहेत. हदगाव-हिमायतनगर मतदारसंघात



त्यांनी उभा केलेला जनसंपर्क आणि संघटनशक्ती आजही प्रभावी मानली जाते. त्यामुळे पक्षीय सीमा ओलांडून त्यांना पाठिंबा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.विशेष म्हणजे काँग्रेसमधील काही नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांकडून जवळगावकरांना संधी द्यावी असा दबाव वाढत असल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे भाजप आणि शिंदे गटातील काही स्थानिक नेतेही त्यांच्याविषयी सकारात्मक भूमिका घेत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे निवडणूक जवळ येत असताना पडद्यामागील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

मराठवाडा जनहित पार्टीचे नगरसेवक निर्णायक ठरू शकतात, अशीही राजकीय वर्तुळात चर्चा आहे. अपक्ष नगरसेवकांची भूमिका अंतिम टप्प्यात महत्त्वाची ठरणार असून, ही निवडणूक केवळ पक्षीय ताकदीची नसून वैयक्तिक संपर्क, स्थानिक प्रभाव आणि रणनीतीची परीक्षा ठरणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

दरम्यान, माधवराव पाटील जवळगावकर यांनी अद्याप अधिकृत भूमिका जाहीर केलेली नसली तरी समर्थकांकडून वातावरण निर्मिती सुरू झाली आहे. त्यामुळे नांदेड विधानपरिषद निवडणुकीत माधव पर्व खरोखर अवतरणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

# नांदेड जिल्ह्यात खरीप साठी मुबलक खत साठा उपलब्ध

नांदेड जिल्हा प्रतिनिधी खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांच्या दृष्टीने खत ही सर्वात महत्त्वाची निविष्ठा असते. राज्य पातळीवर खताचे नियोजन कृषी आयुक्तालय, पुणे येथून होत असते. कृषी आयुक्तालयाकडून खरीप हंगामाच्या सुरवातीलाच जिल्ह्यासाठीचे खताचे आवंटन कळवले जाते. नांदेड जिल्ह्याला खरीप हंगामासाठी दरवर्षी सरासरी २ लाख मेट्रिक टन खतांची आवश्यकता असते. खरीप हंगाम २०२६ साठी नांदेड जिल्ह्याला सुमारे २,११,५०० मे.टन इतके खत आवंटन प्राप्त झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने ६०,२०० मे. टन युरिया, ३२३०० मे. टन डीएपी व ८५३०० मे. टन संयुक्त खते यांचा समावेश आहे.

मागील वर्षीची शिल्लक व यावर्षी १ एप्रिल पासून आजतागायत झालेला पुरवठा याचा अभ्यास केल्यास बाजारात ३१,०९८ मे. टन युरिया होता. पैकी १ एप्रिलपासून आज अखेर १४,५९७ मे. टन युरिया ची विक्री झाली असून १६,५०२ मे. टन युरिया मार्केट मध्ये उपलब्ध आहे. १९,२७५ मे. टन डीएपी पैकी ७,६०० मे. टन विक्री झाली असून आज बाजारात ११,६७४ मे. टन डीएपी खत उपलब्ध आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे डीएपी सारखे खत आवश्यकतेपेक्षा थोडे कमी उपलब्ध असले तरीही २०:२०:०:१३, १२:३२:१६ यासारखे संयुक्त खतांचे पर्याय शेतकऱ्यांना वापरता येतील. सद्यस्थितीत ६७,००० मे. टन संयुक्त खता सहित एकूण १,२५,५०० मे. टन खते बाजारात उपलब्ध आहेत.

टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास शेतकऱ्यांना सुलभ खत पुरवठा होण्याच्या दृष्टीने 'बफर स्टॉक' म्हणजेच संरक्षित खतसाठा निर्माण केलेला आहे. आज रोजी यामध्ये ४,०२८ मे. टन युरिया व १,४८५ मे. टन डीएपी खत उपलब्ध आहे.

त्यामुळे कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, आपण कृषी विद्यापीठाच्या शिफारसीत खतमात्रानुसार, जमीन आरोग्य पत्रिका अहवालानुसार तसेच पीक वाढीच्या टप्प्यानुसार खत खरेदी करावे.

शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये व खत तुटवड्याच्या भीतीपोटी अनावश्यक खत खरेदी करू नये. खते उपलब्ध होण्यात अडथळा निर्माण झाल्यास, वाजवीपेक्षा जास्त दरात खत विक्री होत असल्यास, खतामध्ये कोणत्याही प्रकारची लिंकिंग होत असल्यास अथवा बोगस खतांची विक्री होत असल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

---

# एल-निनोच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाची जनजागृती मोहीम गावोगावी फिरत्या लाउडस्पीकरद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

नांदेड जिल्हा प्रतिनिधी यावर्षी एल-निनो या हवामान घटकाचा प्रभाव राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला असून, कमी पाऊस व पावसातील खंडामुळे दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी विशेष जनजागृती मोहीम सुरू केली आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार जूनमध्ये सौम्य, जुलै-ऑगस्टमध्ये मध्यम तर सप्टेंबरमध्ये तीव्र स्वरूपाचा एल-निनो राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई न करता किमान ८० ते १०० मि.मी. पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

सहायक कृषी अधिकारी गावनिहाय पावसाचे प्रमाण व जमिनीतील ओलाव्याची पाहणी करून त्यानुसार पेरणीबाबत मार्गदर्शन करणार आहेत. दुबार पेरणी टाळण्यासाठी शेतकऱ्यांना योग्य वेळी सल्ला दिला जाणार आहे.

पावसातील अनिश्चितता लक्षात घेऊन तुर- सोयाबीन आंतरपीक पद्धतीचा अवलंब करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. तसेच उताराला आडवी पेरणी, रुंद सरी-वरंबा पद्धत, बेड मेकरद्वारे लागवड आणि कमी कालावधीच्या वाणांचा वापर यांसारख्या तंत्रज्ञानाची माहिती दिली जात आहे. सोयाबीनसाठी च-णड-७२५, गड-९३०५ तर तुरीसाठी इऊछ-७११ व गोदावरी या वाणांची शिफारस करण्यात आली आहे.

याशिवाय जैविक खतांचा वापर, बीजप्रक्रिया, सापळा पिके, पिवळे चिकट सापळे, पक्षीथांबे आणि नैसर्गिक शेती यांसारख्या कमी खर्चिक उपाययोजनांबाबतही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जात आहे.

ही माहिती नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक गावात सकाळ-सायंकाळ फिरत्या लाउडस्पीकरद्वारे सहायक कृषी अधिकारी, एटीएम आणि बीटीएम यांच्या माध्यमातून पोहोचवली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळणे सोपे होत आहे.

दरम्यान, 'महाविस्तार २.०' पद्वारे शेतकऱ्यांना हवामानविषयक सल्ला, कीड-रोग व्यवस्थापन आणि तज्ज्ञांशी थेट संपर्काची सुविधा उपलब्ध झाली आहे. जिल्ह्यात सध्या सुमारे १ लाख ३३ हजार शेतकरी हे प वापरत आहेत.शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या सल्ल्यानुसारच पेरणी करावी आणि दुबार पेरणी टाळावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

यावर्षी एल-निनो या हवामान घटकाचा प्रभाव राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला असून, कमी पाऊस व पावसातील खंडामुळे दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी विशेष जनजागृती मोहीम सुरू केली आहे.

## अखेर सिडको हडको परिसरातील मुख्य मार्गावरील

# स्ट्रीट लाईट प्रभाग क्रमांक २० चा नगरसेवक यांच्या सततचा पाठपुराव्यामुळे चालू

नवीन नांदेड -सिडको हडको परिसरातील मुख्य मार्गावर गेल्या अनेक वर्षांपासून अंधाराच्या साम्राज्यात असलेल्या परिसराने अखेर मोकळा श्वास घेतला असुन या भागातील मुख्य रस्त्यांवरील बंद असलेले पथदिवे (स्ट्रीट लाईट्स) अखेर सुरू झाले असून, यामुळे संपूर्ण परिसर प्रकाशाने उजळून निघाला आहे. अनेक वर्षांची ही समस्या मार्गी लागल्यामुळे विविध प्रतिष्ठानचे व्यापारी ,नागरिकांमधून समाधान व्यक्त होत असून, मनपा प्रशासन आणि प्रभाग क्रमांक २० मधील नगरसेवक यांनी पुढाकार घेऊन स्ट्रीट लाईट चालू केल्याने समाधान व्यक्त केले आहे.

सिडको हडको परिसराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी या भागातील भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, मंगला गजानन २



देशमुख, सौ.निरंजना राजू लांडगे आणि सौ.सुवर्णा सतीश बसवदे यांनी दाखविलेल्या एकजुटीमुळेच हा प्रलंबित असलेला स्ट्रीट लाईट प्रश्न सतत केलेल्या पाठपुराव्यामुळे निकाली निघाला आहे.

सिडको-हडको परिसरातील मुख्य रस्त्यांवर रात्रीच्या वेळी अंधार असल्याने वाहन धारकांना आणि पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता,सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला होता. मात्र, पाचही लोकप्रतिनिधींनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे महानगरपालिकेने या रस्त्यांवर नवे आणि पथदिवे कार्यान्वित केले आहेत. रात्रीच्या वेळी रस्ते उजळून निघाल्याने या भागाचे रूपच बदलून गेले आहे.

केवळ पथदिवेच नव्हे, तर या पाचही नगरसेवकांच्या एकत्र येण्यामुळे सिडको हडको परिसरातील इतरही अनेक रखडलेली विकासकामे आता जलद गतीने मार्गी लागणार असल्याचे चित्र आहे. पाणी, रस्ते, आणि सांडपाण्याची व्यवस्था यांसारख्या मोठ्या प्रकल्पांवरही या लोकप्रतिनिधींनी लक्ष केंद्रित केले आहे.अनेक वर्षांपासून या रस्त्यांवर रात्रीच्या वेळी प्रवास करताना भीती वाटायची, नगरसेवकांच्या एकजुटीमुळे आणि मनपाच्या तत्परतेमुळे आता रस्ते उजळले आहेत. डॉ . बाबासाहेब आंबेडकर चौक ते संभाजी चौक,राज चौक, क्रांती चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अण्णाभाऊ साठे पुतळा मार्ग, ज्ञानेश्वर मार्ग, डॉ.ढगे, गोविंद गार्डन या मुख्य मार्गावर हे स्ट्रीट लाईट चालू झाल्याने लोकप्रतिनिधींचे केलेले काम कौतुकास्पद असल्याचे बोलल्या जात आहे,या पाच नगरसेवकांच्या व सदस्य प्रतिनिधी उदय देशमुख,सतिश बसवदे,राजु लांडगे यांनी घेतलेल्या विकासान्मुख भूमिकेमुळे सिडको हडको परिसरात समाधान व्यक्त होत आहे. आगामी काळात या भागाचा कायापालट होणार असा विश्वास नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे.

# शेतकऱ्यांनी डिएपी खतास पर्यायी खते वापरावीत

नांदेड जिल्हा प्रतिनिधी राज्यामध्ये मागील ३ वर्षात खरीप हंगामात ४४ लाख मे.टन रासायनिक खतांचा वापर झाला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने युरिया, डीएपी, एमओपी (म्युरेट ऑफ पोटॅश), संयुक्त खते व एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) या खतांचा वापर केला जातो.

महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये लवकरच पेरणीला सुरुवात होणार असून डिएपी खताची शेतक-यांकडून जास्त मागणी होणार आहे. डिएपी (ऊ़ळ--ोपळ्ीी झर्हेीहिरींश) खता मध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत.

राज्यामध्ये डीएपी खताचा पुरवठा अपेक्षेप्रमाणे होत नाही त्यामुळे पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी (डळपसश्रश डीशिी झर्हेीहिरींश) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे.

एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके -१०:२६:२६, एनपीके - २०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६, युरिया एसएसपी कॉम्पलेक्स व एनपीके-१५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो.

त्याचबरोबर टिएसपी (ढीर्ळीश्रिश डीशिी झर्हेीहिरींश) या खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असुन डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखिल डिएपी खतास उत्तम पर्याय आहे.चालू खरीप हंगामामध्ये शेतक-यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून राज्यातील सर्व शेतकरी बांधवाना करण्यात येत आहे.



## पर्यटन स्थळांच्या विकासासाठी आ.सुरेश धस यांनी घेतली ना.शंभुराजे देसाई यांची भेट

पाटोदा ,प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे पर्यटन मंत्री शंभुराजे देसाई यांची आ.सुरेश धस यांनी मुंबई येथे भेट घेतली व जिल्ह्यातील असणाऱ्या पर्यटन स्थळांसाठी व जिल्ह्यातील विविध विकास कामां संदर्भात चर्चा केली. याबाबत अधिक माहिती अशी की मेघदूत, शासकीय निवास, मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री.ना. शंभूराजे देसाई यांची सदिच्छा भेट आ.सुरेश धस यांनी घेतली.यावेळी पर्यटन विकास, जनहिताच्या विविध बाबी तसेच जिल्ह्यातील विकासकामांबाबत सकारात्मक चर्चा झाली.असुन पर्यटन स्थळांच्या विविध असणाऱ्या आराखडा तयार केलेले आहेत यासह आदी बाबीवर सकारात्मक चर्चा झाली.

# जिल्हा रुग्णालयात जागतिक मासिक पाळी स्वछता दिवस साजरा

नांदेड जिल्हा प्रतिनिधी -जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालय नांदेड येथे आज जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस ढेसशींहशी षीर झशीळेव त्रीळशपवश्रू ळपवळर या घोषवाक्याने साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एस.एम पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अवसरे, निवासी वैद्यकीय अधिकारी (बा.से) डॉ. आर.एस. बुट्टे, तसेच बाह्यरुग्ण विभागाच्या मेट्रन श्रीमती सुनिता राठोड, जझऊ इंचार्ज नारवाड सिस्टर, सर्व इंचार्ज सिस्टर, स्टाफ व महिला उपस्थित होत्या.धनश्री अर्जुनराव गुंडाळे राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम समुपदेशक तसेच आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट चा उजास उपक्रमाचे जिल्हा समन्वयक सुचित्रा भगत यांनी मासिक पाळी संदर्भात माहिती देऊन मासिक पाळी स्वछता दिवस का साजरा केला जातो, मासिक पाळी विषयी समाजात असलेले समज गैरसमज बद्दल मार्गदर्शन केले. मासिक पाळी म्हणजे काय ? तिचे व्यवस्थापन, सॅनेटरी पॅड चा उपयोग त्याची व्हीलेवाट या बद्दल माहिती देताना राष्ट्रीय मासिक पाळी कार्यक्रम सर्वेमध्ये असे निदर्शनास आले आहे की, सन २०१५-२०१६ मध्ये सॅनेटरी पॅड चा वापर ४१.८ टक्के होता तर यात वाढ होऊन सॅनेटरी पॅड वापर सन २०२०-२१ मध्ये ६४.१ टक्के इतकी वाढ झाली आहे म्हणजेच २२.३ टक्के नी वाढ झाली आहे. तर या वरून असे लक्षात येते की मासिक पाळी बाबत जागरुकता वाढून साधनांचा वापर वाढला आहे. मासिक पाळी कप हा शोषक साहित्य म्हणून आरोग्य तसेच निसर्गाला पोषक म्हणूनही महिला व मुलींमध्ये मासिक पाळी कप वापरण्याचे प्रमाण वाढले आहे.

तसेच मासिक पाळी मध्ये काय काळजी घेतली पाहिजे, आहार कसा घ्यावा, योगा हा आरोग्यासाठी किती महत्वाचा आहे या विषयी माहिती दिली तसेच मासिक पाळी विषयी समाजामध्ये असणारे गैरसमज याविषयी न लाजता बोलले म्हणजे मासिक पाळी स्वछता दिवस साजरा केला असा संदेश दिला.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नांदेड जिल्ह्यात स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू मोहिमेचे आयोजन

### लोकसहभागातून स्वच्छता व पर्यावरण संरक्षणाला चालना

नांदेड जिल्हा प्रतिनिधी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नांदेड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दि. १ जून ते ५ जून २०२६ या कालावधीत स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू मोहिम राबविण्यात येणार असून ग्रामस्थांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले आहे.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेद्वारे ग्रामीण भागात स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, हवामान बदलाबाबत जनजागृती तसेच पर्यावरण संरक्षणासाठी लोकसहभाग वाढविण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

मोहिमेअंतर्गत प्लास्टिक कचरा कमी करणे, कचऱ्याचा पुनर्वापर करणे, सांडपाण्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन, कचऱ्यापासून खत व उपयुक्त वस्तू निर्मिती, ओला व सुका कचरा विलगीकरण तसेच पर्यावरणपूरक जीवनशैलीचा प्रसार याबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे.

ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छता अभियान, श्रमदान, स्वच्छता शपथ, वृक्षारोपण, जनजागृती रॅली, शाळा व अंगणवाडी स्तरावरील विविध उपक्रम तसेच विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार आहे.दि. १ एप्रिल २०२६ पासून लागू झालेल्या घनकचरा व्यवस्थापन नियमांबाबत ग्रामस्थांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात येणार असून गावपातळीवर कचऱ्याचे चार प्रकारांमध्ये वर्गीकरण, प्लास्टिकमुक्त परिसर निर्मिती, सांडपाणी व्यवस्थापन तसेच सामुदायिक स्वच्छता सुविधांच्या प्रभावी वापराबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मोहिमेचा समारोप दि. ५ जून रोजी विशेष ग्रामसभेद्वारे करण्यात येणार आहे.या मोहिमेत सर्व गट विकास अधिकारी, ग्रामपंचायती, अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे, महिला बचत गट तसेच नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड तसेच ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब यांनी केले आहे.

# डीपीच्या फुटलेल फेज , उघडे केबलच्या स्पार्किंगने केळी बाग जळून खाक ; शेतकऱ्याचे १५ लाखांहून अधिक नुकसान

### कॉन्ट्रॅक्टरच्या दुर्लक्षामुळे मोहखेड येथे शेतकऱ्यावर संकट

प्रतिनिधी । धारूर

धारूर तालुक्यातील मोहखेड येथे डीपीच्या फुटलेले फेज व उघड्या केबलमधून झालेल्या स्पार्किंगमुळे भीषण आग लागून शेतकरी रणधीर सोळंके यांची सव्वाचार एकरांवरील केळी बाग जळून खाक झाल्याची घटना बुधवारी दुपारी घडली होती. या आगीत केळीची उभी बाग, ठिबक सिंचनाचे साहित्य तसेच इतर शेती साहित्य भस्मसात झाले असून शेतकऱ्याचे तब्बल १५ लाख रुपयांहून अधिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.तलाठी आर .बी . भद्रे यांच्याकडून पंचनामा करण्यात आला आहे .

तालुक्यातील मोहे खेड येथील रणधीर सोळंके यांच्या शेतालगत विद्युत वितरण कंपनीची डीपी असून त्यावरील फेज फुटलेले होते. तसेच काही केबल उघड्या अवस्थेत लोंबकळत होत्या. बुधवारी दुपारच्या सुमारास या केबलमधून अचानक स्पार्किंग सुरू झाले आणि त्यातून निघालेल्या ठिणग्यांनी केळी बागेला आग लागल्याचा अंदाज तुमचा नियमित वर्तविला आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे आणि कोरड्या वातावरणामुळे आगीने काही क्षणांतच डीपी लगत असलेल्या संपूर्ण बागेला विळखा घातला.घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकरी व



मोहखेड येथील शेतकरी रणधीर सोळंके यांच्या शेतातील केळीचा बाग व ठिबक सिंचनाचे साहित्यआगीमध्ये जळून १५ लाख रुपयांच्या जवळपास नुकसान झाले आहे .यात शेताला लगलेल्या आग ही डीपी मध्ये पार्किंग होऊन लागल्याचे तलाठी आर . बी . भद्रे यांनी सांगितले

ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीची तीव्रता मोठी असल्याने त्यांना यश आले नाही. पाहता पाहता सव्वाचार एकरांवरील केळीची झाडे जळून खाक झाली. ठिबक सिंचनासाठी टाकण्यात आलेल्या पाईपलाइन, प्लास्टिक साहित्य व अन्य उपकरणेही आगीत नष्ट झाली आहेत .

दरम्यान, या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मोदखेड हे तेलगाव विद्युत वितरण उपविभागा अंतर्गत आहे . ग्रामीण भागातील अनेक डीपींची अवस्था धोकादायक असून फुटलेले फेज, तुटलेल्या केबल, उघडे वायर याकडे संबंधित विभाग व कॉन्ट्रॅक्टर दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. डीपी दुरुस्ती व देखभालीची कामे खासगी कॉन्ट्रॅक्टरकडे देण्यात आली असली तरी प्रत्यक्षात कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचे परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे.

कागदोपत्री दुरुस्ती दाखवली जाते, मात्र प्रत्यक्षात फुटलेल्या केबल व खराब डीपी तशाच अवस्थेत राहतात. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवितासह शेतीचे मोठे नुकसान होत आहे .

घटनेनंतर तलाठी आर. बी. भद्रे यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. प्राथमिक पाहणीत डीपीमधील स्पार्किंगमुळेच आग लागल्याचे स्पष्ट झाल्याचे त्यांनी सांगितले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यास तातडीने आर्थिक मदत देण्याची तसेच संबंधित कॉन्ट्रॅक्टर व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे .

## अंबाजोगाई शहरात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन; बकरी ईद निमित्त बांधवांची गळेभेट!

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आज शहरात बकरी ईद (ईद-उल-अजहा) हा सण अत्यंत उत्साहात आणि पवित्र वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी सर्व मुस्लिम बांधवांनी मुख्य ईदगाह मैदान आणि विविध मशिदींमध्ये एकत्र जमून पवित्र ईदची नमाज अदा केली. देशात शांतता, समृद्धी आणि बंधुभाव नांदावा यासाठी या वेळी विशेष प्रार्थना करण्यात आली. सामाजिक सलोख्याची नवी पायरीनमाज संपल्यानंतर ईदगाह मैदानाच्या परिसरात एक अतिशय हृदयस्पर्शी दृश्य पाहायला मिळाले. नमाज पठण करून बाहेर पडणाऱ्या मुस्लिम बांधवांचे स्वागत करण्यासाठी शहरातील विविध स्तरांतील मराठा आणि हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील मान्यवरांसह सर्वांनीच पुढे होऊन मुस्लिम बांधवांची गळेभेट घेतली आणि त्यांना ईदच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. मान्यवरांची उपस्थितीया प्रसंगी शहरातील अनेक राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी एकमेकांना पेढे भरवून सणाचा आनंद द्विगुणित केला. आपली संस्कृती ही एकत्र राहण्याची आणि एकमेकांच्या सुखात सामील होण्याची आहे, हेच आजच्या या दृश्याने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे, अशा भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केल्या.या सोहळ्यामुळे शहरातील हिंदू-मुस्लिम ऐक्याची परंपरा अधिक घट्ट झाली असून, सर्वत्र या सलोख्याचे कौतुक होत आहे.

# केज येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर उत्साहात ५० हून अधिक दात्यांचे रक्तदान

केज/प्रतिनिधी

प्रजावत्सल आणि आदर्श राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून केज शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून आयोजित केलेल्या या शिबिराला तरुण आणि नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, अत्यंत उत्साही वातावरणात हे शिबिर संपन्न झाले.जयंती उत्सवाच्या सुरुवातीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन स्थानिक ज्येष्ठ नागरिक आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी अहिल्यादेवींच्या लोक कल्याणकारी कार्याचे आणि जलव्यवस्थापना तील त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. केवळ पारंपारिक पद्धतीने जयंती साजरी न करता,समाजातील रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन या विधायक उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल उपस्थितांनी संयोजकांचे कौतुक केले.

सकाळ पासूनच शिबिराच्या ठिकाणी रक्तदानासाठी तरुणांनी मोठी गर्दी केली होती.



विशेष म्हणजे,यामध्ये पहिल्यांदाच रक्तदान करणाऱ्या नवोदित तरुण-तरुणींची संख्या लक्षणीय होती.यावेळी रक्तदान करून घेण्यात आले.या शिबिरात दिवसभरात एकूण ५० पेक्षा जास्त रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले.सर्व रक्तदात्यांना संयोजकांच्या वतीने प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.शिबीर यशस्वी करण्यासाठी केज शहरातील विविध पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव समिती,शिव मल्हार प्रतिष्ठान मंडळांचे कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.या कौतुकास्पद उपक्रमामुळे केज परिसरामध्ये सर्वत्र समाजोपयोगी जयंती साजरी केल्याबद्दल आनंद व्यक्त होत आहे.

आदर्श रक्तपेढी छत्रपती संभाजीनगर,रक्तपेढी प्रमुख डॉ.इलियाज पटेल पॅथॉलॉजी पर्यवेक्षक साक्षी बेलोरे,रोहन खरात,संध्या सुरवसे, आनंत सारूक,तसलीम काझी आदींनी रक्त संकलनाचे काम पूर्ण केले.रक्तदाते रंजना रोडे,

माऊली रोडे,कृष्णा रोडे, बाबुराव रोडे,राम डुकरे, अशोक निंगुळे,मनोज कदम,अरविंद बोबडे, भारत दांगट,माजी नगराध्यक्ष पशुपतिनाथ दांगट,लक्ष्मण कोल्हे, कृष्णा गाढवे,निखिल काळे,गणेश कांदे, अतिश गाढवे,भागवत काळे,सुभाष निंगुळे, प्रतीक भोसले,आदित्य गायके,ईश्वर गायके, सुंदर रोडे,सागर माळी, दया भोसले,शैलेश भूतकर,केशव रोडे, अरबाज कुरेशी,सार्थक सुडके,संदीप जाधव, नगरसेवक बालाजी जाधव,रंजीत जाधव, सखाराम गायके,उत्सव समितीचे अध्यक्ष बालाजी गाढवे, अभिजीत भालेकर,ओम मुळे महेश रोडे,प्रशांत गुंड,मंगेश सातपुते,अभी गायकवाड,रामदास डापकर,राम गाढवे, राजेश्वर रोडे आदी रक्तदात्यांनी रक्तदान केले.

## बारसवाड्यात आनंद अनुभूती शिबिराचे आयोजन तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

अंबड /प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे बारसवाडा येथे आध्यात्मिक मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्याचा अनोखा संगम घडवून आणणाऱ्या आनंद अनुभूती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. श्री.श्री.रवि शंकर यांच्या प्रेरणेतून आर्ट ऑफ लिविंग टीम अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर दि. ४ जून ते ९ जून दरम्यान आयोजित करण्यात आले असून दररोज सायंकाळी ६.०० ते ८.०० या वेळेत शिबिर पार पडणार आहे.

आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीमध्ये मानसिक शांतता सकारात्मक विचार आणि निरोगी आयुष्याची गरज लक्षात घेऊन या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये प्राणायाम ध्यान धारणा सुदर्शन क्रिया जीवन जगण्याची कला तणावमुक्त जीवनशैली आत्मविश्वास वाढविणारे मार्गदर्शन तसेच आनंदी आणि संतुलित जीवनासाठी आवश्यक विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

विशेषत युवक आणि तरुण पिढीने मानसिक ताणतणावातून मुक्त होऊन सकारात्मक ऊर्जा मिळवावी यासाठी हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. अध्यात्म आरोग्य आणि आनंदाचा संगम असलेल्या या उपक्रमामुळे बारसवाडा परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या शिबिराचा लाभ घेण्यासाठी बारसवाडा व परिसरातील नागरिक युवक-युवती यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आर्ट ऑफ लिविंग टीम अंबड यांच्या वतीने करण्यात आले आहे.